बुधवार, २७ मार्च २०२४

किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

मराठी दैनिक

वर्ष - ०३ अंक - २१३

आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक



●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) WEDNESDAY 27 MARCH 2024 adhunikkesari.com ●YEAR-03 ●ISSUE-213 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05


सस्नेह निमंत्रण

दैनिक आधुनिक केसरी आयोजित

# महाराष्ट्राचा महाकवी 2024

आधुनिक केसरी विश्वव्यापी मराठी दैनिक

AEONPLAY

## पुरस्कार वितरण-कविसंमेलन



**शुभहस्ते**

मा. श्री. इंद्रजीत भालेराव
(सुप्रसिद्ध कवी)



**उद्घाटक**

मा. श्री. वसंत मुंडे
(प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई )



**प्रमुख उपस्थिती**

मा. श्री. डॉ. अतुल नाईक
(डायरेक्टर एऑन प्ले)



**विजेते**

मा. श्री. नामदेव तुकाराम चोथे



**कविसंमेलनाच्या अध्यक्षा**

मा. डॉ. सौ. संजीवनी तडेगावकर
(प्रसिद्ध कवयित्री)


**कधी**

गुरूवार दि. 28 मार्च 2024
सायंकाळी 4 वाजता

**कुठे**

कुलस्वामिनी मंगल कार्यालय, सिडको एन-8, आझाद चौकाजवळ, छत्रपती संभाजीनगर

**कवी संमेलनात सहभाग**



प्रा. विजय पोहनेरकर



विनोद जैतमहाल



कस्तुरी कुलकर्णी



प्रशांत मुळे







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

त्यामुळे शंकरांनी आपला तृतीय नेत्र उघडून कामदेवाला भस्म केले. होळी सण प्रत्येक भागात वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. त्यामागे वेगवेगळ्या आख्यायिकाही आहेत. ढुंढा नावाची एक राक्षसी होती. ती लहान मुलांना त्रास देत असे. तिच्यामुळे मुले भयग्रस्त झाली होती. तिच्यामुळे रोगराई पसरत होती. तिला हाकलून लावण्याचे अनेक प्रयत्न केले गेले. शेवटी लोकांनी गावात ठिकठिकाणी अग्नी प्रज्वलित करून आणि तिला बीभत्स शिव्या शाप देऊन पळवून लावले असे म्हटले जाते. म्हणूनही होळी साजरी केली जाते. होळीचा दुसरा दिवस धुळवड किंवा धूलिवंदन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी होळीतील रक्षा एकमेकांच्या अंगावर उधळली जाते. राख किंवा रक्षा म्हणजेच धूळ. पण होळीतील ही राख अतिशय पवित्र समजली जाते. ती अनिष्ट गोष्टींचा नाश करते. वातावरणातील सकारात्मक शक्तीचे प्राबल्य वाढवते म्हणून आपण धूलिवंदन साजरा करतो. पण आजकाल धुळवड किंवा धूलिवंदन या शब्दाचा अर्थच आपण विसरलो आहोत. उत्तर भारतीय लोकांचे अनुकरण करून त्या दिवशीच आपण रंगपंचमीचा आनंद घेतो. पण आपल्याकडे रंगपंचीमीचे सुद्धा एक आगळेवेगळे महत्व आहे. फाल्गुन कृष्ण पंचमी म्हणजे रंगपंचमी. या दिवशी वृंदावनात राधा आणि कृष्ण रंग खेळले अशी आख्यायिका आहे. एका आख्यायिकेनुसार बरेच दिवस भगवान श्रीकृष्ण वृंदावनात गेले नाहीत. राधा आणि गोपिका यांना कृष्णाचा विरह सहन करावा लागला. राधा तर त्या विरहात जणू कोमेजून गेली. तिचा आनंदच जणू हरवला. राधेच्या दुःखी होण्याने वृन्दावनातील झाडे फुले सुद्धा कोमेजली. सृष्टीतील चैतन्य जणू हरवले. भगवान कृष्णांनी मग पुन्हा सगळी सृष्टी चैतन्यमय केली. झाडे, फुले पुन्हा बहरून आली. राधेचा रुसवा दूर करण्यासाठी श्रीकृष्णांनी तिच्या अंगावर फुले उधळली. वृन्दावनातील मंदिरात भगवान श्रीकृष्णांवर देखील फुलांची किंवा पाकळ्यांची उधळण केली जाते. असेही सांगितले जाते की फाल्गुन कृष्ण पंचमीला श्रीकृष्णांनी राधा, गोपिका आणि गोकुळातील समस्त स्त्रीपुरुषांना एकत्र आणून त्यांच्यासोबत रंग आणि रासक्रीडा केली.



## आनंदी पहाट

# घवघवीत यश मिळाले कि आनंद प्राप्त होतोच

आधुनिक केसरी

आपल्या आयुष्यातील अनेक निर्णय इतरांच्या विचारांनी घेतले जातात किबहुना त्यांच्या मतांवर ठरत असतात. आपल्या स्वतःसाठी अगदी आपल्याच अंतर्मनांत वैचारिक मंथन आपण का घडवून आणत नाही? प्रत्येक विचाराची सुरुवात सकारात्मकतेनं होणं जरुरीचं, आवश्यक असल्याचं समजून घेतलं पाहिजे. एका विशिष्ठ वैचारिक बैठकीच्या चौकटीत राहून मानसिकदृष्ट्या सुखद वातावरणाची आपल्याला सवय झालेली असते. ती चौकट भेदून काही वेगळा विचार करता येऊ शकतो, त्याचा निराळा अनुभव येऊ शकतो हेच आपण लक्षांत घेऊ शकत नाही.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

सद्यःस्थितीतील आपली जीवनशैली, दिनचर्या, व्यावसायिक व्यवधानं आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या ह्या सर्व बाबींमुळे अनेकदा आपण स्वतःसाठी सुद्धा पुरेसा वेळ देऊ शकत नाही. अनेक गोष्टींचा थोडा हटके विचार करू शकत नाही अथवा तसा तो करायचा विचारही मनांत येत नाही. आपण, शिक्षणाअगोदर संस्कार, व्यापाराअगोदर व्यवहार आणि देवाअगोदर स्वतःच्या अंतर्मनाला समजून घेतलं तर जीवनांत कोणतीच अडचण येत नाही. मनाला मनःपूर्वक मानलं, समजून घेतलं, मोकळं केलं, आनंदी ठेवलं, तंदुरुस्त ठेवलं, सकारात्मक विचारांमध्ये गुंतवलं आणि नकारात्मक विचारांपारून दूर ठेवलं कि फक्त आणि फक्त भरघोस घवघवीत यश आणि आनंदच प्राप्त होत राहतो. एकमेकांच्या उणिवा दूर करणं आणि जाणीवा जपणं ह्या प्रेरणा अशाच वातावरणात मिळत असतात. स्वतःपेक्षा दुसऱ्यांकडून, इतरांकडून अवास्तव अपेक्षा केल्या जाऊ लागल्या कि, परस्परांमध्ये तणावाचं वातावरण निर्माण होऊ लागतं. कुटुंबामध्ये संवाद, सहवास, सहकार, सहभाग, समानता ह्या बाबी टिकवून ठेवणं जरुरीचं असतं.




आधुनिक केसरी

## रक्षितो तयासी | बाप विठु ||


निरागस दृष्टी | भाव निरागस ||
सात्विकात खास | देव वसे ||१||
अहंकार मुळ | क्लेशाचे कारण ||
पातकी मरण | जीतेपणी ||२||
रज तम दोन्ही विकारांचे दास
मायावी आभास | भूल पडे ||३||
जाणली जयाने | कर्म भक्ती ज्ञान ||
त्याचे अंतःकरण | शुद्ध झाले ||४||
बालक होऊनी | भजावे हरिसी ||
रक्षितो तयासी | बाप विठु ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८



## हितगुज



पुष्प 26 वे

गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे,
दिंडोरी (नाशिक)

## अमंगल स्वाहा करा


खगोल शास्त्रानुसार प्रत्येक महिन्याच्या पौर्णिमेला चंद्र ज्या नक्षत्रात असतो, त्यानुसार मराठी महिन्यांचे नामकरण झाले आहे. फाल्गुन पौर्णिमेचे नक्षत्र पूर्वाफाल्गुनी आहे. पूर्वाफाल्गुनीच्या पौर्णिमेच्या अमृतकलेने मानवी सतसंवेदनांना अमृतमय करण्यासाठी होळीचा सण, धुळवड साजरी केली जाते. भावनांची सुंदर, मोहक रंगपंचमी साजरी करण्यासाठी संयमाच्या, शिस्तीच्या, परिश्रमांच्या संकल्पांच्या ज्वाला पेटवून असत्, अमंगल, घृणास्पद, कलंकीत स्वाहा करण्याचा संदेश हा सण देतो. या देशात राख किंवा भस्म ही पूजासामुग्री बनले आहे. दुःख भस्मीभूत करून त्यावर बोधाचे शिवलिंग स्थापावे, दुःखाला दवा बनवावे, असाच संदेश देऊन भारतीयांनी दुःखाचा धीराने स्वीकार केला आहे. अशाच अग्नीपूजनाच्या प्रसंगी संत रामदासांना स्फुरले असेल की, “वन्हि तो चेतवावा, चेतविताच चेततो। केल्याने होत आहे रे आधी केलेची पाहिजे।” फाल्गुन महिना ही हिंमत देणारा, पुरूषार्थ जागवणारा महिना आहे. निसर्ग ही शिकवण देणारा, जीवनेच्छा व जीवनशक्ती वाढविणारा मोठा शिक्षक आहे.

शिशिरात पूर्ण निष्पर्ण झालेली झाडे ज्या धीरगंभीरतेने नव्या पालवीची वाट पाहतात व वसंत येताच तेवढ्याच धैर्याने, शांततेने नवी पालवी, नवे चैतन्य धारण करतात. जीवनात असेच सुख-दुःखांचे चक्र अनुभवले म्हणजे मनाचा तोल सांभाळला जातो. उजाड करणारी खोल जखम होत नाही. घरातल्या कुंड्यामध्ये कैक्टस वाढवणार्या शहरी संवेदनांना हे कळणार नाही पण आमचे आदिवासी बंधू हजारो वर्षांपासून निसर्गाचे अतुट मित्र बनून समृद्ध मनाने जगताहेत. जरा मैत्रीची हाक व हात त्यांच्यापर्यंत पोहचू द्या, तरच खरी प्रगतीची सुरूवात होईल.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र. ९९२२४२००३४**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

जाग्रित और सुषोप्ति के,
स्वप्न मध्य महँ होय ।
संस्कार दुख सुख वने, मन अभास भय
सोय ।।२८।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल अष्टम अध्याय) ०२/०८/२८ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : जागृत आणि सुषुप्तिच्या मध्ये स्वप्न अवस्था असते, ज्यावेळी संस्कार सुख-दुःखाचा भास मनात होतो. मन बाह्य विषयांना सोडून आपल्या संस्कारांनुसार सुख-दुःखाचा अनुभव, स्वप्न अवस्थेत करते.




स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# भगवंताचे होण्यास आपण निर्दोष असणे जरूर आहे

आधुनिक केसरी

भगवंताचे समाधान आम्हाला न मिळण्याचे कारण, आम्ही ज्याचे आहोत असे वाटते ते आम्हाला सोडता येत नाही; प्रपंच आम्हाला हवासा वाटतो. जगाच्या तोंडाकडे पाहून समाधान मिळेल असे आपल्याला वाटते. ही प्रपंचाची आणि जगाची आस सोडून भगवंताचे दास झाल्याशिवाय आम्हाला समाधान मिळणे कठीण आहे. हे दास्यत्व येण्यासाठी भगवंताच्या प्राप्तीची उत्कंठा आम्हाला लागणे जरूर आहे. ही उत्कंठा यावी तरी कशी ? भगवंताचे होण्यासाठी आम्ही अगदी निर्दोष असणे अवश्य आहे. हे निर्दोषपण येण्यासाठी, आपण खरोखरच जसे नाही तसे जगाला दिसू नये. मनाने नेहमी शुद्ध असावे. आपण खरोखर चांगले नाही असे आपल्याला कळत असतानासुद्धा लोक आपल्याला चांगले म्हणतात, याची आम्हाला खंत वाटणे जरूर आहे. जगात आपले वागणे असे असावे की, आपल्याविषयी दुसऱ्या कुणाला शंकाही येता कामा नये. ढोंग मुळीच करू नका. आचारविचाराने इतके पवित्र झाल्यानंतर मग



आम्हाला भगवंताचे का बरे होता येणार नाही ? भगवंताचे झाल्यावर आम्हाला काळजीचे काही कारण आहे का ? आपण सर्वजण ‘ आम्ही भगवंताचे आहोत ’ असे म्हणतो आणि काळजी करतो, हे किती विपरीत आहे ! ही प्रपंचाची काळजी नाहीशी होण्यासाठी, प्रपंचातले सर्व वैभव, धनदौलत ही आपली कर्तबगारी नसून, ती रामाच्या इच्छेने आली आहे असे आम्ही म्हटले पाहिजे. ‘ माझा प्रपंच तुझ्या इच्छेने चालला आहे, तू ठेवशील त्यात मी समाधानात राहीन, ’ अशी आमची वृत्ती बनायला पाहिजे. यासाठी मोठे वैराग्य पाहिजे असे नाही. खरोखर, ते वैराग्य, त्याग, वगैरेंच्या भानगडीत तुम्ही पडू नका. भगवंत ठेवील त्या परिस्थितीत समाधानात राहाणे यासारखे दुसरे वैराग्य कोणतेही नाही. ज्याच्यामध्ये भगवंताचा विसर पडेल, त्याच्यावर वैराग्य करा. ज्याच्यामध्ये भगवंताची आठवण राहील, तो विवेक समजून आचरणात आणा. प्रपंच उत्तम करा, पण त्याच्या अधीन होऊ नका. अधीन होणे हे पाप आहे, प्रपंच करणे हे पाप नाही. शक्य तितके धर्माचे पालन करा; नीती प्राणाबरोबर सांभाळा; आणि प्राण गेला तरी नामाची धुगधुगी राहू द्या, इतके नाम तुम्ही सांभाळा. या तीन गोष्टी तुम्ही सांभाळा. गोंदवल्याला तुम्ही इतकी मंडळी येता, मला संकोच असा वाटतो की, इतका पैसा खर्च करून, इतक्या अडचणी सोसून, इतके कष्ट करून तुम्ही येता, तर बरोबर काय घेऊन जाता ? काहीतरी बरोबर घेऊन जाऊन आचरणात आणा. नामस्मरणात तुम्ही सगळ्यांनी राहा. नामाकरिता नाम घ्या.

## मुमुक्षुलक्षण

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

मनाच्या श्लोकात पण अनुतापावर समर्थानी आपले विचार प्रगट केले आहेत.
मुमुक्षु पणाची दोन अंगे आहेत. एकीकडे आतापर्यन्त घालवलेल्या जीवनातील अनुताप आणि त्याचबरोबर आत्मज्ञाना बद्दल तळतळ ही मुमुक्षुपणाची दोन अंगे आहेत. अनुतापाने पूर्वीच्या जीवन पद्धतीत खुपच बदल होतो. म्हणून तर.साधुसंत मुमुक्षपणाला "नवीन जन्म म्हणतात. या नव्याने जन्मलेल्या जगात मुमुक्षु संतांची संगत धरतो व श्रेष्ठ पदाला पोहचतो. हे विचार आजच्या दिवशीची समर्थांची भेट आहे असे समजून वागले तर जीवन सुसह्य होईल यात शंकांचं नाही.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
बुधवार, २७ मार्च २०२४
adhunikkesari.com

# ‘हायवे मॅन’ सिनेमाप्रमाणे गडकरीही फ्लॉप होणार

## नाना पटोले : पवार व ठाकरेंनी आंबेडकरांचा प्रस्ताव मान्य करावा

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर : महाविकास आघाडीच्या जागा वाटपात दोन जागांवर अजून निर्णय झालेला नाही, त्यावर चर्चेतून लवकरच मार्ग निघेल. आघाडीचा धर्म सर्वांनीच पाळला पाहिजे. सांगली व भिवंडी या काँग्रेसच्या परंपरागत जागा आहेत, या जागांवर काँग्रेस पक्षाकडे चांगले उमेदवार आहेत. सांगलीत जे झाले ते बरोबर झाले नाही. असे म्हणत वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांच्या प्रस्तावासाठी काँग्रेसने एक पाऊल पुढे टाकले आहे आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या मित्र पक्षांनीही तो प्रस्ताव मान्य करावा, असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केले आहे.**

नागपूर येथे प्रसार माध्यमांशी बोलताना नाना पटोले म्हणाले की, देशाचे संविधान व लोकशाही टिकवणे हे सर्वांचे काम आहे. आताची निवडणूक ही देश वाचवण्यासाठी आहे. भाजपाचा पराभव करणे हाच मुख्य उद्देश आहे. महाविकास आघाडी या लोकसभा निवडणुकीत भाजपाचा दारूण पराभव करेल. मागील १० वर्षात भाजपाने खोटी आश्वासने देऊन देशाला बरबाद केले त्याचा उगम हा नागपुरच आहे. महागाई, बेरोजगारी प्रचंड वाढलेली आहे, शेतकऱ्याला उद्ध्वस्त केले आहे. देशावर कर्जाचा मोठा डोंगर करून ठेवला आहे. जनतेमध्ये मोदी सरकारविरोधात प्रचंड असंतोष आहे त्यामुळे मोदी सरकारला धडा शिकवल्याशिवाय जनता गप्प बसणार नाही असे चित्र सगळीकडे आहे.

नागपूरमध्ये भाजपाचा उमेदवार कोण आहे हे महत्वाचे नाही. ही लढाई विचाराची आहे. हायवे मॅन चित्रपट फ्लॉप झाला, मोदींवर काढलेला चित्रपटही फ्लॉप झाला पण मुन्नाभाई एमबीबीएस चित्रपट मात्र सुपरहिट झाला होता.

आज जनतेला गांधी विचाराची आवश्यकता आहे. विकासाच्या नावाखाली नागपूरचे बेहाल करुन ठेवले आहेत. नेमका कोणाचा विकास झाला? कुठे गेले मिहान? मालवाहतुक करणारी विमाने उतरतील आणि शेतकऱ्यांना फायदा होईल, या आश्वासनांचे काय झाले. नागपूर शहरात सिमेंटचे रस्ते बनवले आहेत, आधीच नागपुरात जास्त तपमान व आता सीमेंटचे रस्ते यामुळे तापमान



आणखी वाढणारच. स्थानिक मुद्द्यांबरोबरच राष्ट्रीय मुद्द्यांवरही या निवडणुकीत भर दिला जाणार आहे. काँग्रेस पक्षात एकजूट असून नागपूरमधून काँग्रेस व महाविकास आघाडीचा उमेदवार २.५ लाख मताधिक्क्याने विजयी होईल, असा विश्वास नाना पटोले यांनी व्यक्त केला आहे. महाविकास आघाडीच्या विकास ठाकरे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी सकाळी व्हरायटी चौकातील गांधी पुतळ्याला आदरांजली अर्पण करण्यात आली व नंतर अर्ज दाखल करण्यात आला. विकास ठाकरे यांचा अर्ज दाखल करतेवेळी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी मंत्री अनिल देशमुख, माजी मंत्री सुनिल केदार, माजी केंद्रीय मंत्री विलास मुत्तेमवार, माजी मंत्री सतिश चतुर्वेदी, अनिस अहमद, आ. अभिजीत वंजारी, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव रामकिसन ओझा, प्रफुल्ल गुडधे यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# अमेरिकेनेही घेतली केजरीवालांची दखल

आधुनिक केसरी न्यूज

**दिल्ली :** मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना कथित मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी ईडीकडून अटक झाली. यानंतर न्यायालयाने त्यांना २८ मार्चपर्यंत ईडी कोठडी सुनावली. अरविंद केजरीवाल सध्या तुरुंगात असून त्यांच्यावर झालेल्या अटकेच्या कारवाईवर जर्मनीने एक टिप्पणी केली होती. जर्मनीने केलेल्या टिप्पणीनंतर भारताने संतप्त प्रतिक्रिया देत खडेबोल सुनावले होते. आता अरविंद केजरीवाल यांच्यावरील अटकेच्या कारवाईप्रकरणी अमेरिकेनेही प्रतिक्रिया दिली आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते म्हणाले, मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावरील अटकेच्या कारवाईवर भारतातील विरोधी पक्ष लक्ष ठेऊन आहेत. तसेच केजरीवाल यांच्यावरील अटकेच्या प्रकरणावर आम्हीदेखील बारकाईने लक्ष ठेऊन आहोत. निष्पक्षपणे कायद्याच्या प्रक्रियेचे पालन होईल, अशी आम्हाला अपेक्षा आहे.

मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावरील अटकेसंदर्भात जर्मनीच्या परराष्ट्र मंत्रालयाने प्रतिक्रिया दिली होती. यामध्ये जर्मनीने म्हटले होते, अरविंद केजरीवाल यांच्यावरील कारवाईची आम्ही दखल घेतली आहे. भारत लोकशाही असणारा देश आहे. केजरीवाल यांना निष्पक्ष खटला चालवण्याची संधी मिळेल, अशी आम्हाला आशा आहे, अशी प्रतिक्रिया जर्मनीने दिली होती. अरविंद केजरीवाल यांच्या अटकेवर जर्मनीच्या परराष्ट्र मंत्रालयाने टिप्पणी केली होती. यानंतर भारताने नाराजी व्यक्त केली होती. तसेच भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने जर्मन राजदूताकडे यासंदर्भात नाराजी व्यक्त करत जर्मनीने केलेली टिप्पणी ही भारताच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप आहे, असे म्हटले होते. अशा प्रकारच्या टिप्पण्यांना आम्ही देशाच्या न्यायालयीन प्रक्रियेत हस्तक्षेप करणे किंवा आमच्या न्यायव्यवस्थेच्या स्वातंत्र्यावर हल्ला करण्याच्या दृष्टीने पाहतो. भारत हा लोकशाही असणारा देश असून जर्मनीने केलेले वक्तव्य अयोग्य आहे, असे खडेबोल भारताने जर्मनीला सुनावले होते.

# सुधीर मुनगंटीवार म्हणजे कर्तृत्व, वक्तृत्व-नेतृत्वाचा तिहेरी संगम

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : विकासाचे दुसरे नाव सुधीर मुनगंटीवार



आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महाराष्ट्राच्या सत्तेत परिवर्तन घडवून आणणारे, राज्याला हिरवेगार करणारे आणि चंद्रपूरचा चौफेर विकास साधणारे सुधीर मुनगंटीवार हे कर्तृत्व, वक्तृत्व-नेतृत्वाचा तिहेरी संगम असून त्यांना ऐतिहासिक मतांनी विजयी करा, असे आवाहन महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चंद्रपूर-वणी-आर्णी मतदारसंघातील जनतेला केले.

भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि मित्र पक्षाचे अधिकृत उमेदवार सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी मंगळवारी, 26 मार्च 2024 रोजी निवडणूक उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी गांधी चौकात आयोजित करण्यात आलेल्या सभेला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस संबोधित करत होते.

यावेळी मंचावर भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, माजी खा. हंसराजजी अहिर, खा. रामदास तडस, आ. संदीप धुर्वे, आ. संजीव रेड्डी बोदकुरवार, आ.अशोक उईके, आ. महेश बालदी, आ. प्रशांत ठाकूर, माजी आमदार आशीष देशमुख, संजय धोटे, सुदर्शन निमकर,भाजपा ज्येष्ठ नेते चंदन सिंग चंदेल, भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, भाजपा माजी जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, भाजपा महानगराचे जिल्हाध्यक्ष राहुल पावडे,भाजपा ज्येष्ठ नेते विजय राऊत, प्रमोद कडू, राजेंद्र गांधी विधानसभा प्रमुख रमेश राजूरकर, लोकसभा विस्तारक रवी बेलूरकर,भाजपा महिला प्रदेश सचिव वनितातार्ई कानडे, भाजपा नेते अशोक जीवतोडे,राष्ट्रवादी कांग्रेसचे अध्यक्ष नितीन भटारकर, राजीव कक्कड, भाजपा यवतमाळ जिल्हा अध्यक्ष तारेंद्र बोरडे, शिवसेना जिल्हाप्रमुख नितीन मत्ते, बंडू हजारे, आरपीआयचे अध्यक्ष गौतम तोडे, हरीश दुर्योधन, सिद्धार्थ पथाडे, डॉ. मंगेश गुलवाडे, संध्याताई गुरनुले, ब्रिजभूषन पाझारे, अलका आत्राम, रामपाल सिंग, विवेक बोढे, राजू गायकवाड,सूरज पेदुलवार, किरण बुटले, प्रजवलंत कडू, सविता कांबळे , नामदेव डाहुले, राखी कंचरलावार, महेश देवकते, विशाल निंबाळकर, आशिष देवतळे, अनिल डोंगरे मित्र पक्षातील सर्व पदाधिकारी व हजारो भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि मित्र पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

**चंद्रपूरची तोफ दिल्लीत धडकणार**

ना. सुधीर मुनगंटीवार यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला 350 वर्षे पूर्ण झाल्यानिमित्ताने संपूर्ण देशातून त्यांना मानवंदना मिळवून दिली. इंग्रजांनी चोरून नेलेली ऐतिहासिक छत्रपतींची वाघनखे परत आणण्यासाठी धडपड केली. अशा अनेक अस्मितेच्या मानकां संदर्भात त्यांनी उत्तम काम केले आहे. त्यांनी विकासाची गंगा आणून चंद्रपूरचा चेहेरामोहरा बदलला आहे. चंद्रपूरचे मुलुख मैदान गाजवणा-या ना. सुधीर मुनगंटीवार यांची तोफ आतापर्यंत मुंबईत धडकत होती आता ती दिल्लीत धडकणार आहे, अशा आशावाद उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

**विकासाचे दुसरे नाव सुधीर मुनगंटीवार :** ही राज्याची नाही तर देशाची निवडणूक असून देशाचा नेता कोण असेल, देशाचे नेतृत्व कोणाच्या हाती द्यायचे याचा निर्णय जनतेने घ्यायचा आहे . देशामध्ये मोदीजींचे राज्य आणायचे की राहूल गांधींचे हे ठरवायचे आहे . देशाचा विकास करायचा असेल तर सर्व समाजाला जो सोबत घेऊन चालू शकतो, समाजाची दु :ख मांडू शकतो अशा नेत्यालाच निवडून द्या . तसा नेता म्हणजे सुधीर मुनगंटीवार असून त्यांना ऐतिहासिक मतांनी निवडून देण्याचा निर्धार चंद्रपूर–वणी–आर्णी मतदारसंघातील जनतेने करावा, असे आवाहन त्यांनी केले .

**सुधीरभाऊ राहणार ‘ एक नंबर ’वर :** महाराष्ट्रामध्ये महायुतीचा फॉर्म भरायची सुरुवात कोठून करायची यावर जेव्हा विचारमंथन झाले तेव्हा सर्वांनी एकमताने चंद्रपुरात सुधीर मुनगंटवार यांचे नाव ठरवण्यात आले . ही सुरुवात चांगली झाली आहे . ज्याची सुरुवात चांगली होते त्याचा शेवटही चांगला होतो . त्यामुळे सुधीरभाऊ ‘ एक नंबर ’वर असून आता ‘ अबकी बार 400 पार ’ करून मोदीजींना परत एकदा पंतप्रधान बनवून विकासीत भारत निर्माण करण्याचा संकल्प आपण करायचा आहे, असे उपमुख्यमंत्री म्हणाले .

**सुधीरभाऊंना ऐतिहासिक विजय प्राप्त करून द्या :** ना . सुधीर मुनगंटीवार यांनी अर्थशास्त्र कळते, त्यांना महाराष्ट्राची नाळ कळते . आतापर्यंत हंसराज अहीर यांनी चंद्रपूरचा विकास केला . त्याच्या दहापट विकास विकास करायचा असेल तर ना . सुधीर मुनगंटीवार हा एकमेव नेता आहे . सर्वांनी एकत्र येऊन सुधीर भाऊंना ऐतिहासिक विजय प्राप्त करून द्यावा, असे आवाहन चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले .

# रघुराम राजन यांची टीका

आधुनिक केसरी

भारताचा आर्थिक विकास होत आहे, असा विश्वास निर्माण करून त्याची जाहीरात करण्यात येत आहे. अशी जाहीरात करून भारत सर्वात मोठी चूक करत आहे. सर्वप्रथम भारताला महत्त्वाच्या समस्यांचे निराकरण करावे लागेल, त्यानंतरच भारत शाश्वत विकासाच्या दृष्टीने पुढे जाऊ शकतो, असे मत भारतीय रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर रघुराम राजन यांनी व्यक्त केले. लोकसभा निवडणुकीनंतर ज्या पक्षाचे सरकार येईल, त्यांना सर्वप्रथम आपल्या देशातील मनुष्यबळाचे शिक्षण आणि कौशल्य विकास यावर काम करावे लागेल. हे जर केले नाही, तर भारताला आपल्या तरूण लोकसंख्येचा काहीही लाभ होणार नाही, असेही ते म्हणाले. रघुराम राजन म्हणाले की, भारताने सध्या अर्थव्यवस्थेच्या अवाजवी प्रसिद्धीवर जो विश्वास टाकलाय, तो चिंतेचा विषय आहे. अर्थव्यवस्था रुळावर आणण्यासाठी आपल्याला अनेक वर्ष कठोर परिश्रम करावे लागले होते. सध्या अर्थव्यवस्थेबद्दलची जी प्रसिद्धी केली जात आहे, ती राजकारण्यांकडून होत आहे. कारण त्यांना त्याची गरज आहे. पण इतर भारतीय नागरिकांनी त्यावर विश्वास ठेवणे, ही सर्वात मोठी चूक होऊ शकते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ रोजी भारत विकसित राष्ट्र बनलेले असेल, असे ध्येय ठेवलेले आहे. याबद्दल प्रश्न विचारला असता रघुराम राजन म्हणाले की, हे ध्येय मूर्खपणाचे आहे. जर देशातल्या मुलांना माध्यमिक शिक्षण मिळत नसेल, अनेक विद्यार्थी शिक्षण घेण्यापासून वंचित राहत असतील, तर हे ध्येय गाठता येणार नाही. “आपल्याकडे प्रचंड मनुष्यबळ आहे. पण या मनुष्यबळाच्या हाताला काम दिले नाही, तर त्याचा काहीही उपयोग होणार नाही. त्यामुळे भारताला सर्वातआधी या मनुष्यबळाचे कौशल्य विकसित करून त्यांना काम करण्यासाठी तयार करावे लागेल आणि त्यानंतर त्यांना रोजगारही उपलब्ध करून द्यावा लागेल”, असे रघुराम राजन यांनी स्पष्ट केले. राजन यांनी घसरलेल्या शैक्षणिक दर्जावरही भाष्य केले. ते म्हणाले, भारतीय शालेय विद्यार्थ्यांची शिकण्याची पात्रता करोना महामारीनंतर २०१२ च्या पूर्वीच्या स्तरावर पोहोचली आहे. इयत्ता तिसरीतील २०.०५ टक्के विद्यार्थ्यांना वाचता येत नाही आणि इयत्ता दुसरीतील मुलांना लिहिता येत नाही. आशिया खंडातील व्हिएतनाम सारख्या देशातील साक्षरतेपेक्षाही आपला साक्षरतेचा दर घसरलेला आहे. मोदी सरकारने चीप उत्पादनावर भर दिला आहे. यावरही राजन यांनी टीका केली. ते म्हणाले, मोदी सरकार चीप उत्पादनाला अनुदान देत आहे. मात्र उच्च शिक्षणाच्या वार्षिक अर्थसंकल्पाला कात्री लावली जात आहे. सेमी कंडक्टर उत्पादन क्षेत्र स्थापन करण्यासाठी ७६० अब्ज रुपये राखून ठेवण्यात आले आहेत. तर उच्च शिक्षणासाठी केवळ ४७६ अब्ज रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. सरकारने चीप उत्पादनापेक्षा उच्च शिक्षणावर अधिक खर्च करण्याची गरज आहे. जेणेकरून सेमी कंडक्टरच्या व्यवसायासाठी चांगले अभियंते आपल्याला मिळू शकतील.

# धन्य आम्ही तुका वाचीयेला...!



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**हे महामानवा, बा तुकारामा! आजही आपले निर्वाण आठवले की; आठवतात तुमच्या जीवनातील अनंत वेदना आणि त्या पासून जन्मलेल्या जिवंत अभंग संवेदना! उणेपुरे ४२ वर्षे लाभलेले देदीप्यमान आयुष्य! आपले जगणे आपल्या वर्तमानाला हलवून गेले आणि आमचा वर्तमान, भविष्यकाळ फुलवून गेले! आयुष्याचे सोने होणे म्हणजे काय? तुकाराम! यावच्चंद्रदिवाकरौ म्हणजेच तुकाराम! स्वतःच्या जगण्याच्या कविता करणारा हा वेडा कवी कधी अनंत जन्म-मरणाच्या कविता लिहून गेला ते त्यालाही कळले नाही! एखाद्या कवीच्या कविता विकून आणि त्या गावून अनेकांनी आपले इमले उभे केले, गाड्या-घोड्या घेतल्या! केवळ तुझ्यामुळेच अनेकांची लग्ने जुळली!**

केवढा पुण्यवान तू बापा! किती किती अनमोल बीज पेरून ठेवलेस! एवढेच काय तुझ्या नावाने वारकरी संस्था निघाल्या, त्यातून संस्थानिक तयार झाले, मात्र अजून आम्हाला खरा तुकाराम कळलाच नाही!

हे बा, तुकारामा! आज तुझ्या नावावर महाराष्ट्रभर ढोंगी बक्कळ पैसे घेऊन गावोगाव तुझा वेश परिधान करून तुझ्या निर्वाणाच्या निमित्त मगरीचे अश्रू ढाळताहेत! ओरडून लोकांना "तुकोबाराय हे एक महान त्यागी, वैरागी संत होते" असे सांगताहेत. अनेकांनी तर अजून तुझा संपूर्ण गाथा वाचलाही नाही (तेंव्हा त्यांना संपूर्ण तुकाराम कळणार कसा?) आणि तेच तुझ्या नावावर पोतेच्या पोते भरत आहेत! हे तुकोबा, आपलं काय व्हायला हवं होतं? आणि आम्ही काय करत आहोत? जिकडे पहावे तिकडे आग लागली आहे. आज तर अक्षरशः पाणी पेटले आहे! बा तुकारामा, तुझ्या फोटोचा कोण कोण आणि कुठे कुठे दुरुपयोग घेतोय? असे एक अनेक प्रश्न नित्य सतावत असतात! सडेतोड कविता लिहिणारा तुकोबा आमचा वारस असतांना आज आमच्या कविता थिजल्या आहेत. आज लोक खूप शिकले आहेत, परंतु तुझ्या सारख्या कविता फार काही भेटत नाहीत. ज्या शिवबांना आणि मावळ्यांना तूच पाईकीचे अभंग सांगून आपण आपले राज्य, रयत यांच्याशी कसं एकनिष्ठ राहून लोकसेवा केली पाहिजे(?) हा उपदेश केला होता. तो उपदेश तर आम्ही केंव्हाच विसरलो आहोत, तुकोबा! शिवबा आणि तुमचा फोटो मात्र आम्ही एकत्र खुशाल लावतो आहोत! त्या फोटो वापरण्याच्या बदल्यात मांसाहार आणि दारू पिणे मात्र सुसाट सुरु आहे.

असे असले तरी सर्व काही संपले आहे असे मानणारे आम्ही नाहीत. बा तुकोबा! आपल्या जाण्यानंतर आज पावणे चारशे वर्षानंतरसुद्धा तू केवळ अन केवळ तुझ्या शक्तिशाली शब्दांनी आमच्यात जिवंत आहेस! बा तुकोबा, आपला एकेक अभंग आम्हाला शंभर हत्तींचे बळ देऊन जातो. त्या बदल्यात आम्ही मात्र तुझे ऋण फेडू शकत नाहीत. आपल्या अभंगातील एका एका वचनावर अनेक ग्रंथ होतील एवढं सामर्थ्य त्या हृदय शब्दांत आहे.

**अमृताची फळें अमृताची वेली । ते चि पुढे चाली बीजाची ही ॥१॥ ऐसियांचा संग देई नारायणा । वोलाचा वचना जयांचिया ॥ध्रु.॥ उत्तम सेवन सितळ कंठासी । पुष्ट कांती तैसी दिसे वरी ॥२॥ तुका म्हणे तैसें होइजेत संगें । वास लागे अंगें चंदनाच्या ॥३॥**

असे एक एक अनमोल रत्न प्रकट करणारे तुकोबाराय आपल्याला कुठे नेवून



ठेवताहेत? आपल्याला काय विचार करायला लावताहेत? आणि आज आपण काय विचार करत आहोत? माय-बाप वाचक सज्जनहो, आज आपण काय आणि कसा विचार करत आहोत? त्यावरच आपले वर्तमानातील आनंदी जगणे आणि भविष्यातील अनमोल विचारांची पेरणी अवलंबून आहे. आपल्या वाढत्या वयाबरोबर आपल्याला प्रगल्भता आलीच पाहिजे. भेदाचे विचार मावळले पाहिजे. जे काय बोलायचे ते समोरासमोरच बोलले पाहिजे. तुकोबांचा वरील अभंग त्यांच्या विचारांची उंची लक्षात आणून देतो. स्वातंत्र्याचा सखोल आणि सर्वांगीण विचार करणारे तुकोबाराय म्हणजे खरे वाटाडे. आज आपण तुकोबांचे वैश्विक विचार वाचल्यावर आपल्याला आपले हसू यायला लागते! एकही दिवस शाळेत न गेलेले तुकोबा अखंड आयुष्य शाळेत शिकणाऱ्या आणि शिकवणाऱ्यांना अजून कळलेच नाहीत! यापेक्षा शिक्षणाचे दुर्दैव ते काय म्हणावे? आपल्याला फळ कोणते हवे आहे? अमृताचे फळ हवे असेल तर वेल सुद्धा अमृताचीच लावावी लागेल. मग त्या वेलीला फळे, बीजही अमृताचेच येणार! इथे आई-वडील-आपत्य असा त्रिवेणी संगम तुकोबा घडवून आणतात. तुकोबांनी इथे कुटुंबाचे त्रैराशिक मांडले आहे. आपले प्रमाण काय? इच्छा काय? त्यावर आपले फळ अपेक्षित आहे. अगदी याचा आपण सखोल विचार करायला पाहिजे.

तसेच संगतीचा परिपाक सुद्धा तेवढाच तोलामोलाचा आहे. महान लोकांच्या संगतीने आपण कृतार्थ व्हावे. ज्यांच्या वचनात ओल आहे तीच मंडळी माझे संगती. अन्न कसे असावे? खायला उत्तम, कंठाला थंड आणि जे शरीराचे पोषण करते तशी संगती हवी. चंदनाच्या संगतीत क्षणभर जरी राहिले तरी त्याचा सुगंध दरवळतो. त्या न्यायाने अमृताच्या संगतीत आम्ही सतत रहावे अशी तुकोबा प्रार्थना करतात. तुकोबा वाचले की; कुणाचीही प्रतिभा फुलून यावी. त्याच न्यायाने आज तुकोबांच्या निर्वाणादिनी त्यांच्या जीवनाचे असे चिंतन होते.

**धन्य म्हणवीन इहलोकी लोका । धन्य आम्ही तुका वाचीयेला॥ वाचून तव अभंग जीवनी अमृत । जगण्याचे हे वृत्त सांपडले॥ नको बडबड नको बा देखावा । तुकोबा ठसावा खोल अंतरात॥**
**नको काही मागणे कुणाशी । वाचिन लिहीन तुकोबा अहर्निशी॥ कीर्तन भजन झाला पैशाचा खेळ । भक्तीचा मेळ लागेची ना॥ काय मिळे मग देवही रुसला । अंतरी बा ठसा ठसला नाही॥**
**हिंडती दारोदार विकती तुकोबा । यापरीस भिकोबा बरे देवा॥ तुकाराम म्हणून तुका हरविला । सौद्याने खचविला कीर्तनात॥**
**न हे वारस तुकोबांचे होती । वेश मंबाजीचे फिरती घेउनीया॥ जर तुकाराम आज आला खाली । काय काय चाली दिसतसे॥ धाय मोकलून रडे हे पाहून । ढोंग चाले बा सोंग कीर्तनात॥ नको कीर्तन नको बा भजन । पुन्हा मी डोंगरात जातो बापा॥ भाव भक्तीचा तुम्ही बाजार मांडला । तुकोबा रडला कीर्तनात॥ सोडली कंबर बसला खाली । गेला दूरदेशी पक्षी भुर्र उडून बा॥**

चला तर मग! आपल्या परंपरेला आपण जपलेच पाहिजे. आपल्या पूर्वजांचा वसा-वारसा मोठ्या ताकदीने पुढे नेतांना येणाऱ्या काळात सामान्य माणसांनी संतांच्या श्रेष्ठत्वाचा अनमोल खजाना अबाधित राखतांना आपल्याला मोठ्या जबाबदारीने वागावे, बोलावे, लिहावे लागेल. तुकोबांना साता समुद्रापार नेऊन त्यांच्या महान प्रतिभेचा, त्यागाचा, विचारांचा, अक्षरांचा, चरित्र, चारित्र्य, जीवनाचा महान संदेश जगभर पोहोचवावा लागेल. विविध भाषेत तुकोबांच्या अभंगांचे भाषांतर, चिंतन झाले पाहिजे. ज्यांना हिंदी येते त्यांनी तुकोबा हिंदीतून, इंग्रजी येते त्यांनी तुकोबा इंग्रजीतून अनुवादित करून जगभर पसरविला पाहिजे. तुकोबांच्या संगतीने आपण आपले जीवन कृतार्थ करून घेतले पाहिजे. आपला वर्तमान आणि भविष्य उज्वल करायचे असेल तर तुकोबांच्या शब्दांची आजीवन कास धरावी लागेल. त्यांच्या विचारांचे अनुसरण करावे लागेल! असे होणे म्हणजे त्यांच्या बीजाचे वृक्षात रुपांतर होणे आहे, अन्यथा केवळ देखावा! जय तुकोबाराय!

# इतरांच्या मतांबद्दलच चिंतन थांबवा



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**अमुक व्यक्ती आपल्याविषयी काय बोलला तमुक व्यक्ती काय बोलला मग का बोलला असेल मग कारणं काय असेल हेतु काय असेल आपण त्याला किती सहकार्य केले तरी तो असं का बोलला यावर आपण इतक व्यर्थ चिंतन करतो कि जीवनातील अमुल्य किंमती वेळ नको त्या चिंतनात व्यर्थ घालवतो आणि मग शेवटी पदरी काय पडतं तर दुःख याचं चिंतनातून निर्माण होणार दुःख आपल्या जीवनातील दुःखांचा खुप मोठा स्त्रोत आहे आणि हा स्त्रोत फक्त आपला विवेक संपुष्टात आणु शकतो म्हणून आपला विवेक हा सदैव जागृत असला पाहिजे.मग बोलणारा हा त्यांच्या कड असणार्या सामर्थ्य नुसार बोलत असतो शेवटी त्याने काय बोलावं हे त्याचा विवेक ठरवत असतो आपण ते ठरवू शकत नाही.**

त्याच बोलणं आपल्या अखत्यारीत नाही पण तो जे बोलला आहे त्या पैकी काय स्वीकारलं पाहिजे अथवा आपण काय स्वीकारायचं हे तर आपण नक्कीच ठरवू शकतो.महणून आपण ते बोलण न स्वीकारता दुर्लक्ष केलं पाहिजे.पण असं होतं नाही त्याच्या बोलण्याकड आपण इतकं लक्ष का देतो तर आपला विवेक जागृत नसतो.म्हणून आपण इतकं गांभीर्याने याकडे पाहतो.आणि नको ते दुःख जीवनात ओढावून घेतो.इतरांच्या मताचा अथवा बोलणयाचा आपल्यावर आपण इतका परिणाम करुन घेणं म्हणजे आपण स्वतः आपल्या पायावर दगड पाडून घेतल्या सारख आहे.इतरांची मतं हि त्यांच्या सामर्थ्य नुसार असतात मग त्या विषयावरून आपण स्वतःला दुःखी कारण उचित ठरणार नाही. इतरांच्या मताचा परिणाम होऊ देयचा नसेल तर आपला विवेक सदैव जागृत असला पाहिजे.दैनंदिन जीवनात अनेक लोकांशी आपला संपर्क येतो.आणि संवाद पण होतो संवादातील अनेक शब्द वाक्य आपल्या डोक्यात घुमतात आणि आपली स्थिरता बिघडवतात पण आपण सचेत असलं पाहिजे बोलणारा त्याच्या बौद्धिक क्षमतेनुसार बोलत असतो आपण ते स्वीकारलं पाहिजे असं आपल्यावर बंधनं नसतं मग त्याच बोलण आपण स्वीकारण्याच काही करणं नाही.आशात आपला विवेक जागृत असला पाहिजे.जेणेकरून आपण डिस्टर्ब होणार नाहीत. जीवनातील तणावाचं मुख्य कारण इतरांकडून आपल्या संदर्भात झालेलं वक्तव्य अथवा मत आपण एवढं मनावर घेतो कि आपण दुसर्याच्या मतांबद्दल स्वतःला त्रास करून घेतो.हा तणाव फक्त आपलं मानसिक शारिरीक वैचारिकच नुकसान करत नाही तर कधी कधी हा तणाव टोकाला जाऊन आपलं प्रचंड नुकसान मोठं करतो. आपण फक्त पाहत राहतो.व नुकसान होऊ देतो.मुळात आपण हे नुकसान होऊ देता कामा नये. दैनंदिन जीवनात आपला कळतं न कळत कित्येकांशी प्रत्यक्ष अ प्रत्यक्ष पणे संपर्क येणारच अनेक कार्य पार पाडण हे जीवन क्रमाचा भाग असल्याने संबंध येणार नाही असं होण शक्य नाही.याच दरम्यान बोलण्यातून अथवा व्यवहारातुन अनेकदा सहज अथवा जाणिव पुर्वक अशा कारणांमुळे काही शब्दांची देवाण घेवाण होते असते. ज्याची आपण कल्पना देखील करू शकत नाही. साध्याची सामाजिक संस्कृती परस्थिती हि दिवसेंदिवस बिघडत चालली आहे. आपण स्वतः ला वजा करून इतरा बदल मत नोंदविण्याची पद्धत बदलत चालली आहे. इतरांशी बोलताना सामाजिक सौजन्य संपुष्टात येत चालले आहे. अस होत असताना त्याचे परिणाम देखील आपल्या स्वस्थावर होत आहेत.आरेला कारे म्हणत कोण किती टोकाच बोलु शकतो हि जणुकाही स्पर्धा लागली आहे. संयम हा अद्भुत गुण फार फार दुर्मिळ झाला आहे. सामाजिक संस्कृती हि वैचारिक दिवाळखोरी कडे मार्गक्रमण करत आहे. असंच काहीसं सचित्र निर्माण झालं आहे. देणारा हा आपल्याला कुवतीनुसार फुल,काटे,दगड शिव्या शाप दुषण, विचार अविचार,जे काही त्याच्या मध्ये ठासुन भरलेल आहे ते सद्सद्विवेक बुद्धी नुसार देत असतो. देणे हा त्याचा धर्म आहे. पण घेणे हा आपला धर्म नाही. आपण ते स्वीकारलंच पाहिजे असं काही आपल्यावर बंधनं नाही. मग आपण कशासाठी त्यावर उतावीळ असतो. आपल्याला इतरांकडून जे काही मिळालं ते स्वीकारताना आपला विवेक जागृत असला पाहिजे तो जागृत असेल तर मग इतरांकडून आपणांस चांगलं वाईट काहि हि मिळालं तरी त्यातील योग्य तेच आपण स्वीकारणार एवढं मात्र निश्चित. देणारा आपल्याला स्वीकारण्याच बंधनं घालू शकत नाही हिच आपल्या विवेकाची ताकद आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739




# दहा वर्षांत जगाला जे जमलं नाही ते मोदींनी करून दाखविले

## देवेंद्र फडणवीस : चंद्रपूर येथी विजय संकल्प यात्रेत प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** ही निवडणूक देशाची निवडणूक आहे त्यामुळे आपलं मत कोणाला द्यायचं याचा विचार करत असताना आपण देशाची जबाबदारी नरेंद्र मोदीजींच्या हाती द्यायची की राहुल गांधी यांच्या हातात द्यायची त्याचा निर्णय आपल्याला घ्यायचा आहे . ही निवडणूक सुधीर मुनगंटीवार विरुद्ध काँग्रेसचा उमेदवार अशी नाही. तर, या निवडणुकीत तुम्ही सुधीर मुनगंटीवार यांना दिलेलं प्रत्येक मत हे पंतप्रधान मोदी यांना जाणार आहे . जगाच्या इतिहासात जगाला जे जमलं नाही ते नरेंद्र मोदी यांनी करून दाखवलं. १० वर्षात दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या 25 कोटी लोकांना मोदींनी दारिद्र्यरेषेच्या बाहेर काढलेल आहे . सुधीर मुनगंटीवार यांनी महाराष्ट्रात ज्या ज्या मंत्रीपदावर काम केलं त्या सर्व मंत्रिपदाला उल्लेखनीय असं यश मिळवून दिलेल आहे . आता सुधीर मुनगंटीवार यांचा आवाज लोकसभेत धडाडणार आहे . असे मत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विजय संकल्प यात्रेच्या पूर्वी आयोजित केलेल्या सभेत व्यक्त केले . सुधीर मुनगंटीवार यांच्या नामांकन अर्ज दाखल करण्यासाठी काढण्यात आलेल्या भव्य रॅलीच्या आधी स्थानिक गांधी चौक येथे विजय संकल्प यात्रे च्या अनुषंगाने सभा घेण्यात आली त्यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर भाजपाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे , माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहिर , आमदार संजीव रेड्डी बोदुकुलवार, माजी आमदार सुदर्शन निमकर आणि महायुतीच्या घटक पक्षातील पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना फडणवीस यांनी मुनगंटीवार यांनी केलेल्या विविध कार्याचा उल्लेख केला तर देश पातळीवर मोदीजींनी राबविलेल्या विविध योजना सामान्य माणसासाठी किती आणि कशा उपयुक्त ठरल्या आहेत आणि महत्त्वपूर्ण आहेत आणि त्यातून सामान्य व्यक्तीला काय मिळाले आहे यावर भाष्य केले .


भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी महाराष्ट्रातील लोकसभेच्या निवडणुकीसाठी नामांकन अर्ज भरण्याची सुरुवात ही सुधीर मुनगंटीवार यांच्यापासून केली असून या निवडणुकीत भारतीय जनता पार्टी महाराष्ट्राच्या 48 पैकी 45 जागांवर विजय मिळेल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

यावेळी बोलताना सुधीर मुनगंटीवार यांनी देश हा विकासाच्या सर्वोत्तम बिंदूवर जात असताना श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी , श्रद्धेय लालकृष्ण अडवाणी आणि श्रध्येय नरेंद्र मोदी यांच्यासोबत काम करण्याची संधी मला मिळत आहे हे मी आपलं भाग्य समजतो असं मत व्यक्त केले . जातीच्या माध्यमातून मत मागणाऱ्यांनी मत मागणारे हे स्वतःच्या पायावर दगड पाडून घेत आहेत , एका जातीसाठी कोणता उमेदवार काम करत अस3ल तर मतदारसंघातील इतर समाजाच्या लोकांनी कोणाकडे पाहायचं हा प्रश्नच आहे . या लोकसभा क्षेत्रामध्ये सर्व जाती धर्माचे लोक राहत असून मी इथल्या प्रत्येक जाती-धर्माच्या लोकांसाठी आणि या लोकसभा क्षेत्राच्या विकासासाठी सातत्याने कार्यरत होतो आणि यापुढेही कार्यरत राहील . आपल्या लोकसभेचा सर्वांगीण आणि सर्वंकष विकास करण्यासाठी आणि हा मतदारसंघ लोकसभेतील सर्वोत्तम मतदारसंघ करण्यासाठी मी प्रामाणिकपणे प्रयत्न करेन जातीपातीच्या राजकारणापेक्षा विकासाचा राजकारण करण्याला माझ प्राधान्य राहील असं मत यावेळी या संकल्प यात्रेच्या निमित्ताने सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केले. या जाहिर सभेनंतर मुनगंटीवार यांनी शेकडो लोकांच्या सोबत भव्य रॅली च्या माध्यमातून जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन आपला नामांकन अर्ज दाखल केला.

# लोहा पोलिसांची धडाकेबाज मोहीम; आठ ठिकाणी टाकलेल्या दारू, जुगार अड्डयावरील धाडीत ३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** राज्य निवडणूक आयोगाची आदर्श आचारसंहिता संपूर्ण देशभर लागू झाली असून दरम्यान सण उत्सवाच्या पार्श्वभूमीवर लोहा पोलिसांनी शहर परिसरात विविध ठिकाणी दारू व जुगार अड्ड्यावर टाकलेल्या धाडीत अकरा गुन्हे दाखल करण्यात आले असून चौदा आरोपीविरुद्ध गुन्हे नोंदविण्यात आले तर ३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्या असल्याची माहिती लोहा पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी दिली. निवडणूक संदर्भाने लागू असलेली आदर्श आचारसंहिता व होळी आणि रंगपंचमी सणानिमित्त दि. २४ व २५ असे दोन दिवस लोहा पोलिसांनी ठाणे हद्दीमध्ये विविध ठिकाणी छापेमारी करत अवैध दारू बाळगणाऱ्या सात आरोपींकडून १ लाख ५२ हजार १२० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. तर १० आरोपी विरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ ई प्रमाणे सात गुन्हे दाखल केले. दारू विक्री प्रकरणातील आरोपींना ताब्यात घेऊन कायदेशीर प्रक्रिये



नंतर त्यांची सुटका करण्यात आली. तसेच एका जुगार अड्ड्यावर धाड टाकून चार आरोपींना ताब्यात घेवून त्यांच्या जवळील १ लाख ३७ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. सदर आरोपी विरुद्ध जुगार खेळत व खेळवत असल्याचे मिळून आल्याने त्यांच्यावर जुगार अधिनियम १२ अ प्रमाने गुन्हा दाखल केला.

लोहा पोलिसांनी शहरातील विविध ठिकाणी नाकाबंदी सुरू केली असून मोठ्या प्रमाणामध्ये वाहन तपासणी सुरू आहे.

सदरील कार्यवाही पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी केंद्रे, सपोनी रेखा काळे, पोउपनि विश्वदीप रोडे, निवळे, मंगेश नाईक, पोलीस अंमलदार किरपणे, वरपडे, माधव डफडे, एज्युलकुंटे, राठोड, मेकलवाड, दीपक गुट्टे, गृहरक्षक दलाचे संदीप कदम आदींचा समावेश होता.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाची आज मुंबईत बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची उद्या २७ मार्च रोजी सकाळी ११ वा, केंद्रीय संसदीय कार्यकारी समितीची महत्वाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत लोकसभा उमेदवारांच्या संदर्भात चर्चा होणार आहे अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे मुख्य प्रवक्ते महेश तपासे यांनी दिली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक पार पडणार आहेत. या बैठकीला पक्षाचे केंद्रीय पार्लमेंटरी बोर्डाचे सदस्य उपस्थित राहणार आहेत तसेच पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशचे अध्यक्ष आमदार जयंत पाटील, खासदार सुप्रियाताई सुळे, श्री पीसी चाको, श्री अनिल देशमुख, श्री जितेंद्र आव्हाड या बैठकीसाठी उपस्थित राहणार आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने लोकसभा निवडणुकीमध्ये उभे करण्यात येणाऱ्या उमेदवारांबाबत चर्चा, निर्णय व निवडणूक संदर्भात इतर समित्यांचे गठन होणार अशी माहिती महेश तपासे यांनी दिली.

# माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीच्या माध्यमातून 'पेडन्यूज'वर राहणार लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** 'मोबदला म्हणून रोख स्वरुपात किंवा वस्तु स्वरुपात किंमत देऊन कोणत्याही प्रसार माध्यमात (मुद्रण व इलेक्ट्रॉनिक) प्रसिध्द होणारी कोणतीही बातमी किंवा विश्लेषण' अशी प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाने पेडन्यूजची व्याख्या केली आहे. सदर व्याख्या भारत निवडणूक आयोगाने सर्वसाधारणपणे स्वीकारली असून निवडणूक कालावधीत जिल्ह्यात प्रसारीत होणा-या पेडन्यूज वर माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीच्या (एम.सी.एम.सी.) माध्यमातून लक्ष राहणार आहे.

निवडणूक कालावधीत माध्यमात प्रसारित होणारी वृत्त ही उमेदवाराच्या बाजूने काही मोबदला घेऊन प्रसारित करण्यात येत असतील, अशी शंका समितीला आल्यास अथवा तशी समितीकडे कोणी तक्रार केल्यास त्या वृत्तासंबंधी संबंधित उमेदवाराला नोटिसीव्दारे एम.सी.एम.सी समिती खुलाशाची विचारणा करू शकते. जर समितीला संबंधितांचा खुलासा मान्य झाल्यास त्यावर कोणतीही कारवाई करण्यात येत नाही. मात्र समितीला त्याबाबत खुलासा मान्य न झाल्यास संबंधित वृत्त हे पेड न्यूज आहे, असे गृहीत धरून तो खर्च उमेदवाराच्या खर्चात समाविष्ट केला जातो.

जिल्हास्तरीय समितीचा निर्णय उमदेवारास मान्य नसल्यास जिल्हास्तरीय समितीला माहिती देवून राज्यस्तरीय समितीकडे 48 तासाच्या आत अपील करता येते. राज्यस्तरीय समिती 96 तासाच्या आत तक्रारीचा निपटारा करून तसा निर्णय उमेदवार आणि जिल्हास्तरीय समितीला कळवितात. या निर्णयाविरूध्द उमेदवार आदेश मिळाल्यानंतर 48 तसांच्या आत भारत निवडणूक आयोगाकडे अपील करू शकतो. आयोगाचा निर्णय अंतिम असतो.

संशयीत पेडन्यूजची उदाहरणे : प्रेस कौन्सिल ऑफ इंडीयाने संशयित पेडन्यूजसंदर्भात काही उदाहरणे दिली आहेत. यात 1. साधारण एकाचवेळी निरनिराळ्या लेखकांच्या बायलाईन नमुद करून स्पर्धा असलेल्या प्रकाशनामध्ये छापून येणारे छायाचित्र व ठळक मथळे दिलेले समान लेख. 2. निवडणूक जिंकण्याची शक्यता असल्याचा दावा करणा-या उमेदवारांची स्तुती करणारे लेख. 3. उमेदवाराला समाजाच्या प्रत्येक समुहाचा पाठिंबा मिळत आहे व तो मतदारसंघातील निवडणूक जिंकेल, असे नमुद करणारे वृत्त. 4. उमेदवाराला वारंवार अनुकूल असणारे वृत्त प्रकाशित करणे. 5. प्रत्येक वाक्य पक्षाच्या उमेदवाराच्या बाजुने लिहून एखादा पक्ष / उमेदवार याच्याकडून केल्या गेलेल्या कार्याने दुसरा पक्ष / उमेदवार यांचे निवडणूकविषयक भवितव्य संपुष्टात येत असल्याचा दावा करणारे वृत्त. उमेदवार अथवा नोंदणीकृत पक्षांनी आपल्या प्रचारासाठी कोणत्याही माध्यम प्रकारांचा उपयोग करण्यात काहीच गैर नाही. मात्र, हे करत असताना या माध्यमांव्दारे प्रसारित करण्यात येणाऱ्या मजकूराचे प्रमाणीकरण होणे आवश्यक आहे. या जाहिरात मजकूराच्या माध्यमातून कोणाचेही चारित्र्य हनन होऊ नये, समाजा-समाजात तेढ निर्माण होऊ नये, नैतिकता, सभ्यता यांचा भंग होऊ नये, शत्रूत्व-तिरस्काराची भावना निर्माण होऊ नये, याची काळजी घेणे आवश्यक आहे. आदर्श आचारसंहितेमध्ये या सर्व बाबींचा समावेश आहे.

समाज माध्यमांवर लक्ष ठेवण्यासाठी जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालयातील सायबर कक्ष 24 बाय 7 कार्यान्वित असून सोशल मिडीयावरील तक्रारीकरीता 8888511911 हा क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला आहे.

# तुका झालासे कळस



प्रा.बरसमवाड विठ्ठल
गोकुळवाडी. ता. मुखेड

आधुनिक केसरी

**संत तुकाराम महाराजांनी वारकरी धर्मावर कळस चढवला. असे त्यांच्या शिष्या संत बहिणाबाईंनी म्हटले आहे. खरोखर ते योग्यच आहे. कीर्तनाच्या माध्यमातून ज्ञानदान देण्याचे कार्य करून समाज जागृत केला. अभंग निर्मिती करीत त्यांनी जगभरात ज्ञानदीप लावण्या साठी अडगळीत पडलेल्या समाजाला वर काढून ज्ञानामृत पाजण्यासाठी ते पुढे आले. म्हणून समाज परिवर्तन झाले आहे. झोपलेल्या समाजाला जागा करण्याचे महान कार्य त्यांनी केले. त्यांचे अभंग हे वैज्ञानिक सत्यावर आधारित आहेत. वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे असे म्हणून निसर्गाचे संतुलन करण्यास ते सांगतात. हजारो वर्षांपासून ज्या समाजाला ज्ञानापासून वंचित ठेवण्यात आले होते; ते ज्ञान त्यांनी लोकांपर्यंत पोहोचण्याचा जणू विडाच उचलला होता.**

माणसाच्या वर्तनात आणि त्यांच्या वृत्तीत बदल हा कीर्तनातून केला. वारकरी धर्माची पताका त्यांनी जगभर फिरवली. तुकोबांनी एवढे मोठे तत्त्वज्ञान निर्माण केले, की त्यांना प्रेरणा कुठून मिळाली असेल त्यांचे उत्तरही त्यांनी स्वतः दिले आहे.

जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचा आज स्मृतिदिन आहे. जगभरात तुकाराम बीज किंवा बीजोत्सव म्हणून साजरा केला जातो.त्या निमित्ताने आपण ही माहिती घेत आहोत. जो भक्त आपल्यातील अहंकाररुपी गोष्टीचा पूर्ण त्याग करतो. षड्रिपू पासून दूर राहतो. तेव्हाच परमेश्वर त्या भक्ताला दर्शन देतो. म्हणून भक्ती ही अशी करा की प्रत्यक्ष देव तुम्हाला भेटला पाहिजे. धर्म मार्तंडाच्या अन्यायाविरुद्ध उभे राहून समाजाला शहाणे करणारे ते एक महान संत होते. आम्हा घरी धन शब्दाचीच रत्ने, असे सांगून समाजातील अंधश्रद्धा, वाईट चालीरीती, रूढी परंपरा मोडून काढले. बहुजन समाजाला बोलण्याचा, शिक्षण घेण्याचा अधिकार त्या काळात नव्हता, आपल्या विद्वतेच्या बळावर त्यांनी पंडित रामेश्वर भट्टासारख्या व्यक्तींना सुद्धा सडेतोड उत्तर देऊन निःशब्द केले.समाज जागा करून योग्य दिशा दाखवण्याचे काम त्यांनी केले. आज तुकाराम महाराजांच्या विचाराची खरोखरच समाजाला गरज आहे. जगभरामध्ये तुकाराम महाराजांना जो आदर आहे तो कशामुळे तर त्यांच्या प्रतिभेमुळे आहे ,त्यांच्या संघर्षशील प्रवृत्तीमुळे त्यांचा आज सर्वत्र मानसन्मान आहे. तुकाराम महाराज एका ठिकाणी म्हणतात भीत नाही आता आपल्या मरणा अशी त्यांची निडर वृत्ती होती. त्यांच्या अभंगांनी जगाला वेड लावलेले आहे. त्यांचे काव्य सर्वांना स्फूर्ती देणारे आहे

.कठीण परिस्थितीत कोणताही माणूस त्यांच्या अभंगाचे वाचन केल्यानंतर समाधानी होतो. त्याची मनोवृत्ती शांत होते. फिनिक्स पक्षी जसे राखेतून आकाशात उंच भरारी घेतो; तसे तुकोबाचे जीवन संघर्ष रंजल्या गांजल्यापासून आहे की, रात्र दिन आम्हा युद्धाचा प्रसंग आहे. म्हणून मानवी जीवनातील समाधान, सुख सध्याला निघून चालले आहे. आज माणूस समाधान हरून बसला आहे. फक्त संतांचे विचार ऐकून चालत नाहीत. संत साहित्य वाचून समाधान होत नाही. तर त्यानुसार आचरण केले तर खरोखरच आपल्याला सुख समाधान मिळेल. संत तुकाराम महाराजांनी आपल्या जीवनामध्ये लोकांना हेच ओरडून सांगितले आहे. वाईट रूढी, परंपरा विरुद्ध अतिशय परखड शब्दात त्यांनी समाजावर कोरडे ओढले आहेत आणि त्यांना भक्तिमार्गाकडे घेऊन गेले आहेत.

संत तुकाराम महाराज यांच्या अगोदर त्यांच्या आठ ते नऊ पिढ्या विठ्ठलाच्या भक्तीत न्हावून निघालेल्या होत्या. विश्वंभर बाबा पासून ही परंपरा चालत आली होती. पंढरपूर नंतर महाराष्ट्रातील पहिले विठ्ठल मंदिर फक्त देहू या ठिकाणीच उभे केले होते. त्यातील विठ्ठलाची मूर्ती ही स्वयंभू आहे. त्यांनी साध्या सोप्या भाषेत भक्तिमार्ग सांगून करोडो भक्तांचे मने जिंकली. त्यामुळे भक्तांनी त्यांना जगद्गुरु ही सन्मानाची उपाधी दिली त्याकरिता ते वारकरी संप्रदायाचे कळस झाले. सर्वांना शिक्षण देते वेळेस एका शरीराचे तोंड, हात,कान, नाक, पाय हे अवयव आहेत. तसे आपण सर्वजण एकच आहोत, त्यामुळे कोणीही कोणाबद्दल भेदाभेद करू नये अशी एकात्मतेची शिकवण महाराजांच्या अभंगामधून आपल्याला मिळते म्हणून ते भेदाभेद भ्रम अमंगळ असे म्हणतात. आज वाड्या वस्त्यावर सर्वत्र तुकाराम महाराजांचे अभंग घेऊन संत ,महंत कीर्तन करतात या कीर्तनातून समाज प्रबोधन करण्याचे काम केले जाते. त्याचे सर्व श्रेय तुकाराम महाराजांना जाते. संत तुकाराम महाराजांचे आज हजारो मंदिरे गावोगावी बांधली गेलेली आहेत. देहू पासून पंढरपूर पर्यंत अखंड ज्ञानोबा- तुकोबाचा गजर करत वारकरी पायी दिंडी सोहळा काढतात .सर्वधर्म भावाची शिकवण यातून मिळते, म्हणून तुकाराम महाराज हे आपले सर्वांचे प्रेरणास्त्रोत आहेत.



रंजल्या गांजलेल्याचे दुःख ते विठ्ठलाला सांगतात. आपल्या प्रत्येक अभंगातून समाजाला सुधारण्याचे दृष्टांत देतात. तुकाराम महाराज हे खरोखरच अंधश्रद्धा ,रूढी परंपरेचे कर्दनकाळ होते .बहुजन समाजाला प्रकाशाचे झाड कोणी लावून दिले असेल तर ते म्हणजे जगद्गुरु तुकाराम महाराज होय .तुकाराम महाराजांची वाणी हे अमृतवाणी होती. ढोंगी दुराचारी, व्याभिचारी लोकांना त्यांनी पैजरांने मारावेत अशी उदाहरणे दिली आहेत.नाठाळ लोकांना सुद्धा आम्ही वठणीवर आणू असे त्यांनी सांगितले. खरोखरच आपण तुकाराम महाराजांचा बीजोत्सव साजरा करत असाल तर तुकाराम महाराजांचे वर्तन, आचरण आचरणात आणण्याची गरज आहे. ढोंगी लोकांना मदत करू नका. माणसं ओळखायला शिका. अंगाला राख लावून कोणी साधू म्हणत असेल तर त्यांना थारा देऊ नका. अनेक संधी साधू तयार झालेले आहेत हे ओळखा. फुकट कोणाला देणग्या देऊ नका. त्यांनी चारशे वर्षांपूर्वी आपणाला सांगितले आहे. तरच आपल्याला खरा बीजोत्सव साजरा केला. याचे समाधान मिळेल. नाहीतर ढोंगी लोकांना तुम्ही किती खर्च केले तरी ते समाज सुधारणार नाहीत. उलट समाज बिघडण्याचा काम करतील. कसलाही संपत्तीचा त्यांना मोह नव्हता. आपल्या व्यापारातून उरलेल्या पैशातून चरितार्थ चालवत होते, दुष्काळ पडले त्यावेळेस त्यांनी घरातील संपूर्ण साहित्य लोकांना वाटून टाकले. हा किती मनाचा मोठेपणा होता .स्वतःही आपण कृती करून बघा. आपल्याला जमेल काय ? म्हणून संत कोणाला म्हणावे? खरोखरच हे आपला कळाले तर ,जो समाजाचा हित साधतो त्याला संत म्हणावे स्वतःच्या नावावर आश्रम तयार करून वाईट अविचारी लोकांना एकत्रित करून गुंडवृत्तीने वागवून जमीन जुमला एकत्रित करणाऱ्या व्यक्तीला संत म्हणू नये. जो देशाची एकात्मता साधतो .देश आणि व्यक्ती यांचा समन्वय साधून अध्यात्माच्या दरवाजातून सर्वांना एकत्रित आणतो त्याला संत म्हणावे. जिथे कीर्तन झाले तिथं अन्न सेवन करू नये. यांना आपण संत म्हणतो. म्हणून ही संतांची भूमी आहे .बाह्य शुद्धीपेक्षा मनाची शुद्धता झाली की देव भेटतो .आजच्या बुवा बापूंनी कीर्तनकारांनी कर्मकांडाच्या नादी लागून वाईट मार्गाला लागले. नुसती भगवी वस्त्रे. माळा ,खडावा जटा, घालून किंवा दाढी वाढवून कोणी साधु किंवा संत ठरत नाही ,मग खरा साधू कोण? ज्याचे अंतःकरण शुद्ध आहे. स्वतःबद्दल प्रचंड आत्मविश्वास अशा व्यक्तीना संत म्हणावे. साधुत्वाच्या तोऱ्यात चुकीने वागू नये . दाभिंकपणा जगाला दाखवू नये. दया करणे जे पुत्राशी। तेच दास आणि दासी ज्यांच्या मनात कोणत्याही जीवाबद्दल कसलाच मत्सर नाही ,जी व्यक्ती सर्वांगी निर्मळ असून तिचे चित्त हे गंगाजळाप्रमाणे निर्मळ आहे. अशा व्यक्तीच्या गळ्यात तुळशीच्या माळा आहेत. त्यांचे वागणे अतिशय चांगले नियतीला धरून आहे. संसार करून त्यांनी लोकांना उपदेश केला आहे.

अशा व्यक्तीलाच भक्त जगद्गुरु तुकाराम महाराज म्हणतात. म्हणून सर्वांनी त्यांच्या आचरणासार वर्तन करावे, तरच तुकाराम बीज साजरा केल्याचे समाधान मिळेल.

# आंबेडकरी चळवळीतील परीस हरवला



आधुनिक केसरी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीतील दुसऱ्या फळीतील नांदेड जिल्ह्यातील जेष्ठ नेते रिपब्लिकन पार्टी इंडिया चे माजी मराठवाडा अध्यक्ष कालवश मा.मा. येवले साहेब यांच्या निधनाचे वृत्त दि.२६ मार्च २०२४ रोजी सकाळी १२ वाजेच्या दरम्यान सोशल मीडियावर कळाले सदरील वृत समजताच अतिशय दुःख झाले.

मा.मा. येवले साहेब यांचे कार्य , त्यांचे भाषण त्यांचे फुले -शाहू- आंबेडकरी चळवळीतील योगदान नांदेड जिल्ह्यासह मराठवाड्यात फार मोठे होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांने प्रभावित झालेले मा.मा. येवले साहेब यांचे भाषण लोहा व नांदेड येथे ऐकलेली आहेत त्यांच्यासोबत लोहा येथील माजी उपनगराध्यक्ष कालवश संभाजीराव धुतमल साहेब व गंगाधरराव महाबळे यांनी काम केले आहे .तसेच त्यांच्या विषयी मला आंबेडकरी चळवळीतील लोहा येथील जेष्ठ कार्यकर्ते गंगाधरराव महाबळे, जेष्ठ नगरसेवक बबनराव निर्मले यांनी ही आम्हाला अनेकवेळा मा.मा. येवले यांचे कार्य सांगितले.

मा.मा. येवले साहेब हे नामांतराच्या चळवळीत ही सदा अग्रेसर होते. तात्कालीन औरंगाबाद वआताचे छत्रपती संभाजीनगर येथील मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न परमपूज्य बोधीसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे यासाठी ७० ते ९० च्या दशकात महाराष्ट्र भर अनेक आंदोलने झाली त्यात मा.मा. येवले यांचा सक्रिय सहभाग होता.

तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ग्रामीण भागातील खेडोपाडी भीम जयंती काढण्यास त्यांनी पुढाकार घेतला. रिपब्लिकन पार्टी इंडिया चे तात्कालीन राष्ट्रीय अध्यक्ष रा.सु. गवई साहेब यांचे अत्यंत विश्वासू सहकारी होते. पहिल महाराष्ट्रात सरकारी नोकरीसाठी स्पर्धा नव्हती . स्पर्धा परीक्षा नव्हती निवड समिती होती . त्यावेळी रा. सु. गवई साहेब यांनी काँगेस सोबत युती केल्यामुळे ते अनेक वर्ष सतेत होते विधान परिषदेचे उपसभापती राहिले. त्यांनी महाराष्ट्रात अनेक कार्यकर्त्यांना सत्तेतील पदे दिली त्यात नांदेड जिल्ह्यातून मा.मा. येवले साहेब यांना महाराष्ट्र शासनाच्या निवड समितीवर सदस्य म्हणून घेतले त्यांनी तेव्हा मा. मा. येवले साहेब यांनी अनेकांना विभागात अधिकारी - कर्मचारी म्हणून नौकऱ्या लावल्यात यात लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे कर्मचारी गजानन पाटील राऊत सातेगावकर यांनी सांगितले की त्यांचे चुलते राऊत साहेब यांना मा.मा. येवले साहेब यांनी उत्पादन शुल्क विभागात इन्स्पेक्टर म्हणून नोकरीला लावले तसेच लोहा न.पा.त काही वर्षांपूर्वी कोकरे साहेब हे मुख्याधिकारी म्हणून आले होते त्यांनी सांगितले की त्यांना ही मा.मा. येवले साहेबांनी नौकरीला लावले तसेच तात्कालीन नांदेड न.पा. त ही अनेकांना नोकरीला लावले. तसेच त्यांच्या संपर्कात जे जे कार्यकर्ते आले समाज बांधव आलेत त्यांना मा. मा. येवले साहेबांनी नौकऱ्या लावल्या अनेकांना बोर्डिंग दिल्या अनेकांना मद्य दुकानाचे लायसन्स काढुन दिले अनेक कार्यकर्ते स्टॅण्ड केले जसे म्हणतात परीसाजवळ लोखंड गेल्यावर त्यांचे सोने होते तसेच जे जे कार्यकर्ते , नागरिक त्यांच्याकडे कामानिमित्त गेले त्यांचे सोने झाले मा.मा. येवले साहेब हे परीस होते त्यांनी आपले जीवन समाजसेवेसाठी अर्पण केले. त्यांच्या निधनाने आंबेडकरी चळवळीतील कधी न भरुन निघणारी पोकळी निर्माण झाली. तथागत त्यांच्या कुटुंबीयांना या दुःखातून सावरण्याची शक्ती देवो कालवश मा.मा. येवले साहेब यांना भावपूर्ण आदरांजली.

विलास सावळे
तालुकाध्यक्ष मीडिया पोलिस सोशल क्लब पत्रकार संघ लोहा, जि. नांदेड

# शब्द ही माणसांना मिळालेली एक अदभूत शक्ती आहे !

आधुनिक केसरी



दत्ताराम दळवी
मुंबई, ९८२०५२७८५५

निसर्गाने जर शब्द निर्माण केले नसते तर भाषा जन्माला आली नसती आणि भाषा नसती तर वाणी, वाचा म्हणजेच बोलणे जमले नसते. निसर्गातील अनेक गोष्टी या शब्दावर अवलंबून आहेत. शब्द नसते तर नावे नसती, नावे नसती तर निसर्गातील वस्तु ओळखणे कठीण होऊन बसले असते. या शब्दांनीच जगातील विशिष्ठ जागांना नावे दिलेली आहेत. आणि शब्दानीच भाषा अवगत करुन दिलेली आहे. कारण सुगंध हा फक्त फुलांनाच नसतो तर तो माणसाच्या शब्दानाही असतो. प्रत्येक माणसाच्या जीवनात शब्दाला फारच महत्व दिले पाहीजे. कारण या चराचरात शब्द हेच धन, दैवत, शस्त्र, प्रयत्न, देव, भाषा, लय, सूर, ताल, संगीत आहे. जर शब्द रुसले तर मौन व्रत पत्कारावे लागेल. त्यासाठी सर्वकाही शब्दांवर अवलंबून आहे असे म्हटले तर अतिशोक्ती होणार नाही. माणसाचं डोकं शांत असेल तर त्याचे निर्णय चुकत नाहीत. आणि जर शब्द गोड असतील तर माणसं तुटत नाहीत. माणसांनी आपले गुण ओळखावेत, दोष सांगायला लीक आहेतच. काळजी घे हा शब्द काळजातून निघतो, आपल्या आणि परक्यांची जाणीव करुन देतो. कोणी तरी आहे आपल्यासाठी रडणारे या भावनांनीच जीव सुखावतो. काळजी घे या शब्दातच आपलेपणा व आपुलकी द्रवळते. म्हणून पाऊल नेहमी पुढे टाकावे ते ओढायला लोक आहेतच, स्वप्न पाहायचेच झाले तर मोठेपणाचे पहावे कमीपणा दाखवायला लोक आहेतच. समाजात शब्दा शब्दाने संपर्क वाढतो. मात्र सर्वांनी जर शब्द जपून वापरेल तर तुमच्या सारखा साक्षर जगात कोणीही नाही. आपल्याला सगळ्याच शब्दांचा अर्थबोध होतोच असे नाही. कुणाचे शब्द हे मनावर मोरपीस फिरवल्या सारखे सुखद वाटतात तर कुणाचे शब्द हे कट्यार काळजात घुसल्या सारखे जीव्हारी लागतात.

काही भावना शब्दात साकार होतात, तर काही भावना ह्या शब्दांच्या पलिकडे असतात. शब्द हे दुधारी शम्र आहे. कडवट शब्दांनी अनेकदा इतरांची मने दुखावतात तर काहींचे मन परिवर्तन होते. कारण शस्त्रांनी केलेल्या वारांची जखम भरून निघते पण शब्दांनी केलेल्या वारांची जखम भरून निघत नाही. म्हणून शब्द हे इतरांवर फक्त टिका करण्यासाठी शस्त्र म्हणून वापरु नका, तर त्याच शब्दानी जग सुध्दा जिंकता येते हे लक्षात असू द्या. कारण कोणत्याही शब्दाला दात नसतात पण शब्द जेव्हा अंतःकरणाला भिडतात. तेव्हा खुप वेदना होतात. आणि शब्दांचा वार एवढा गहरा असतो की माणसाचं पूर्ण आयुष्य संपून जाते तरी ती घाव काही भरत नाही.' म्हणूनच शब्द ही माणसांना मिळालेली एक अदभूत शक्ती आहे. त्याचा वापर योग्य ठिकाणी योग्य प्रकारच झाला पाहीजे. कारण शब्दांची शक्ती माणसाखेरीच अन्य कोणत्याही प्राण्याकडे नाही.

पुराणात आणि इतिहासात सुध्दा ध चा मा या चुकलेल्या शब्दामुळेच राजकारण घडले हे सर्वज्ञात आहेच. शब्दामुळेच पूर्वीचा इतिहास आज आपण वाचू शकतो. माणसांच्या ज्ञानाचा प्रसार केवळ शब्दांमुळेच केला जातो. आपल्या पूर्वजांचा इतिहास, संस्कृती याचे ज्ञान आणि आपल्याला मिळाली नसती. जर शब्दच नसते तर माणसालाच माणसाचा इतिहास समजला नसता. शब्द हे अनमोल रत्ने आहेत, आईने गायलेली ओवी, बाबांनी केलेला उपदेश, शिक्षकांनी दिलेली शाबासकी, मित्रानी दिलेल्या सदिच्छा, वंदे मातरम व जन गण मन हे राष्ट्रगीतातील शब्द हे नुसते ध्वनी नसून ती संस्कृती आहे. शब्द नुसते बील नाहीत तर व्यक्त केलेल्या भावना आहेत. माणसांचा आनंद, दुःख, त्रास, सहनशक्ती, एकटेपणा, सामर्थ्य आणि मनातल्या अनेक भावना या शब्दातच आहेत.

सर्व व्यवहार हे शब्दांवरच चालतात. स्वर्ग, मृत्यु, हे सुध्दा शब्दाचाच आधार आहे. पैशांचा लोभ नसलेल्या कर्मवादी मनुष्यांसाठी शब्द हेच धन असते, शब्द हाच देव असतो, म्हणूनच त्याच्यासाठी शब्द हेच त्यांचे धन आहे. शारदादेवीच्या मंदिरातील शब्द ही फुले आहेत, तर ध्वनी हा मंत्र आहे, भावना आणि उपासना हे अबीर गुलाल आहेत, देवांचे गायीलेले गुणगान ही सुध्दा शब्दांचीच देणगी आहे. म्हणून शब्द नसते तर पूर्ण जग अबीले झाले असते. सर्वत्र मौनच मौन पसरले असते. म्हणून शब्द जपून वापरा. शब्दांचा आदर करा.

# मोदींच्या विकसीत भारतासाठी अशोक नेतेंना तिसऱ्यांदा लोकसभेत पाठवा : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## शक्ती प्रदर्शन करीत अशोक नेते यांनी दाखल केला उमेदवारी अर्ज

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली:** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात २०३५ चा विकसीत भारत पहायचा असेल तर गडचिरोली लोकसभेतून भाजपचे अशोक नेते यांना तिसऱ्यांदा संसदेत पाठवा. असे आवाहन भाजप नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोली येथे केले. ते भाजपचे उमेदवार अशोक नेते यांचा उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर अभिनव लॉन येथे आयोजित सभेत बोलत होते. मोठ्या रॅलीने शक्तिप्रदर्शन करीत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी खा. नेते यांनी अर्ज दाखल केला. त्यानंतर शहरातील अभिनव लॉन येथे भाजपची पहीली सभा संपन्न झाली. सभेला उमेदवार अशोक नेते, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचेसह मान्यवरांची भाषणे झाली. यावेळी बावनकुळे म्हणाले की मोदींनी मागिल दहा वर्षात भारताला विकासाच्या नव्या उंचीवर नेऊन ठेवलेआहे. आता दारिद्र्य मुक्त विकसित भारतासाठी अबकी बार ४०० पार हा निर्धार केला आहे. यासाठी अशोक नेते यांना प्रतिस्पर्ध्यांची अनामत रक्कम जमा होईल एवढ्या प्रचंड मताने विजयी करावे असे आव्हाहन कले. सुत्रसंचालन रविंद्र ओल्लालवार तर आभार प्रकाश गेडाम यांनी केले.



## वाहनाच्या धडकेने जखमी झालेले वारकरी रामभाऊ कडू पाटील यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज



**नेवासा :** वाहनाच्या धडकेने जखमी झालेले नेवासा तालुक्यातील बाभुळखेडा येथील वारकरी संप्रदायातील निस्सीम सेवेकरी रामभाऊ कडू पाटील वय ७५ हे दवाखान्यातून उपचार घेऊन घरी आल्यानंतर त्यांना श्वसनाचा त्रास होऊ लागल्याने सोमवारी दि.२५ मार्च रोजी सायंकाळी त्यांचे निधन झाले.

नेवासा तालुक्यातील बाभूळखेडा येथील रहिवासी असलेले वारकरी व सेवानिवृत्त पोलीस पाटील रामभाऊ कडू पाटील यांचे काही दिवसांपूर्वी वाहनाने धडक दिल्यामुळे ते जखमी झाले होते.उपचारार्थ त्यांना नेवासाफाटा येथील आत्मदीप हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते.काही दिवस उपचार घेतल्यानंतर त्यांना रविवारी दि.२४ मार्च रोजी घरी सोडण्यात आले मात्र त्यांना बरगडीत मार लागला असल्याने सोमवारी दि.२५ मार्च रोजी त्यांना श्वसनाचा त्रास होऊन लागला व त्यांचे सायंकाळी निधन झाले. कै. रामभाऊ कडू पाटील यांच्या पच्यात एक भाऊ, तीन मुलगी,एक मुलगा,सून,नातवंडे,असा परिवार आहे.कम्युनिस्ट पक्षाचे जेष्ठ कार्यकर्ते लक्ष्मणराव कडू पाटील यांचे ते बंधू,काँग्रेसचे युवा नेते चंद्रशेखर कडू पाटील यांचे ते चुलते होते.तर नगर येथील सामाजिक कार्यकर्त्या विजयाताई भूतकर यांचे ते वडील होत. पोलीस पाटील पदाच्या कारकिर्दीत रामभाऊ कडू पाटील यांनी नेवासा न्यायालयात होणाऱ्या लोकन्यायालयाचे पंच म्हणून त्यांनी काम पाहिले होते नेवासा तालुका प्रवाशी संघटनेचे सल्लागार सदस्य म्हणून ते पदावर होते तर शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी बरेच वर्ष नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरातील पैस खांबाची सेवा सेवेकरी म्हणून केली.अत्यंत मनमिळाऊ वारकरी असलेल्या रामभाऊ कडू पाटील यांच्या अकस्मात निधनाने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.बाभुळखेडा येथील कडू यांच्या वस्तीवर रात्री शोकाकूल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## वारकरी मंडळ जिल्हाध्यक्षपदी निवडीबद्दल हभप अतुल महाराज आदमाने यांचा गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** अखिल भारतीय वारकरी मंडळाच्या जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल नेवासा तालुक्यातील भागवताचार्य हभप अतुल महाराज आदमाने यांचा वारकरी संप्रदायाच्या वतीने खरवंडी येथे झालेल्या कार्यक्रम प्रसंगी संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर नेवासा देवस्थानचे अध्यक्ष पांडुरंग अभंग यांच्या हस्ते सत्कार करण्यात येऊन पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

अखिल भारतीय वारकरी मंडळाचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश महाराज बोधले यांनी अखिल भारतीय वारकरी मंडळाच्या नगर जिल्हयाच्या जिल्हा अध्यक्षपदी युवा कीर्तनकार व भागवताचार्य हभप अतुल महाराज आदमने यांची नियुक्ती केली.आखिल भारतीय वारकरी मंडळाच्या जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल ह.भ.प. भागवताचार्य अतुल महाराज आदमाने यांचा सत्कार समारंभ सोहळयाचे आयोजन सोमवार दि.२५ मार्च रोजी नेवासा तालुक्यातील खरवंडी येथे करण्यात आले होते.

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर खरवंडी यांच्या वतीने सत्कार समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते अध्यक्षस्थानी नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानच्या विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष पांडुरंग अभंग हे होते. तर अखिल भारतीय वारकरी मंडळाचे नेवासा तालुकाध्यक्ष ह.भ.प. रामनाथ महाराज पवार,उपाध्यक्ष ह.भ.प.संजय महाराज सरोदे,जिल्हा कमिटीचे सदस्य ह.भ.प. आबासाहेब पाटील सोनवणे,तालुका कमिटी सदस्य ह.भ. प.अनिकेत महाराज शिंदे,जिल्हा कमिटीचे सदस्य ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली शिंदे,ह.भ.प. हरीभाऊ महाराज भोगे,ह.भ.प. महादेव पाटील दराडे,ह.भ.प. कृष्णा महाराज काकडे,गायनाचार्य शंकर महाराज तनपुरे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.



## श्री कानिफनाथ महाराजांची शनिवारी यात्रा



आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** तालुक्यातील पुनतगाव जुने येथील श्री कानिफनाथ महाराजांची शनिवारी दि.३० मार्च रोजी यात्रा भरत असून यानिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती कानिफनाथ मंदिर देवस्थानचे प्रमुख महंत बालयोगी श्री दीपकनाथजी महाराज यांनी दिली. पुनतगाव येथील प्रवरानदीच्या तीरी श्री कानिफनाथ महाराजांचे मंदिर असून वर्षभर येथे विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.यावर्षी शनिवारी दि.३० मार्च रोजी श्री कानिफनाथ मंदिरात यात्रा भरत असून तीन दिवस चालणाऱ्या यात्रा महोत्सवात भाविकांनी उपस्थिती लावून दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवहान महंत बालयोगी श्री दीपकनाथजी महाराज यांनी केली आहे.

# कार्यकर्त्यांचे समाधान होईल अशा जागा आम्हाला मिळणार : अजित पवार

## रायगड लोकसभा मतदारसंघासाठी प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांच्या नावाची घोषणा

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** दिनांक २८ मार्चला एकत्रित महायुतीची मुंबईत पत्रकार परिषद घेऊन त्यावेळी जागा कुणाला किती मिळणार हे जाहीर केले जाईल. आतापर्यंत ९९ टक्के जागा वाटपाचे काम पूर्ण झाले असून आमच्या कार्यकर्त्यांचे समाधान होईल अशा जागा आम्हाला मिळणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार यांनी पुणे येथील पत्रकार परिषदेत सांगितले.

दरम्यान रायगड लोकसभा मतदारसंघासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांच्या उमेदवारीची घोषणा अजितदादा पवार यांनी आज पुणे येथे केली. आज पुणे येथे राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंत्री, आमदार व पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. त्यानंतर अजितदादा पवार यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे, कृषीमंत्री धनंजय मुंडे, महिला प्रदेशाध्यक्षा रुपालीताई चाकणकर आदींसह पक्षाचे मंत्री, आमदार, पदाधिकारी उपस्थित होते. महायुतीच्या ४८ जागा असून त्यामध्ये जवळपास कुणी कोणत्या जागा लढवायच्या याबाबत मागेच ८० टक्के काम पूर्ण झाले आहे. आता ९९ टक्के काम झाले आहे. पहिल्या व दुसऱ्या टप्प्यातील उमेदवार जाहीर करणे क्रमप्राप्त होते. पहिल्या टप्प्यात विदर्भातील निवडणूक होणार आहे.

आंबेगाव येथे शिवाजीराव आढळराव पाटील हे २० वर्षापूर्वी पक्षातून गेले होते ते आज पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करत आहेत. दुसरी जागा तिथेच जाहिर करेन असे सांगतानाच बाकीच्या जागा २८ मार्चला जाहिर करणार आहोत असे अजितदादा पवार म्हणाले.

पाच वर्षापूर्वी लोकसभा निवडणुका झाल्या त्यावेळी ४८ जागा होत्या. आम्ही महाविकास आघाडीच्या वतीने लढलो होतो. त्यामध्ये भाजपच्या २३ जागा निवडून आल्या. शिवसेनेच्या १८ जागा निवडून आल्या आणि ४ राष्ट्रवादी काँग्रेसला मिळाल्या एक नवनीत राणा यांना पुरस्कृत केले होते. तर



एमआयएमची एक जागा अशा निवडून आल्या होत्या. मात्र माध्यमांमध्ये कारण नसताना राष्ट्रवादी फक्त तीन जागा लढवणार अशा पध्दतीने गैरसमज पसरवण्याचे काम करण्यात आले. आमच्या महायुतीत कुणाचेही गैरसमज नाहीत. मित्रपक्षांनी २३ जागा निवडून आणल्या आहेत तेवढ्या जागा मिळाव्यात अशी अपेक्षा होती. त्यात एकत्र बसून अतिशय व्यवस्थित मार्ग काढलेला आहे असेही अजितदादा पवार यांनी सांगितले.

या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंत्र्यांवर एक - एक लोकसभा आणि आमदारांवर एक एक विधानसभा मतदारसंघाची जबाबदारी टाकण्यात आली आहे. बाकीची टिम आमची काम करणारच आहे. शिवाय जिथे महायुतीचे उमेदवार असतील तिथे मंत्री व आमदारांनी उमेदवार निवडून आणण्यासाठी काम करायचे आहे असेही ठरल्याचे अजितदादा पवार यांनी सांगितले. जाहीरनाम्यावर काम सुरू आहे तो लवकरच दिला जाईल. स्थानिक प्रश्न आहेत तेही त्या जाहीरनाम्यात यावेत अशी भूमिका आहे. स्टार प्रचारक यादीवर एकत्र बसून चर्चा झाली आहे त्यामुळे ती यादी लवकरच जाहीर करण्यात येईल. राज्यातील लोकसभा प्रचारक म्हणून राष्ट्रवादीकडून धनंजय मुंडे हे अगोदरच जाहीर करण्यात आले आहे. अशा पध्दतीने आम्ही लोकांसमोर जाणार असून लोकांचा विश्वास आम्ही जिंकू आणि नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी महाराष्ट्राचे बळ त्यांच्या पाठीशी उभे करु असा निर्धार करण्यात आल्याचेही अजितदादा पवार यांनी स्पष्ट केले.

लोकशाहीत कुणालाही भेटण्याचे आणि बोलण्याचा अधिकार आहे. माझ्यावर टिका होते आहे आणि तुम्हीही करु शकता माझी भूमिका ही फक्त विकासाला, देश प्रगतीपथावर पुढे चालला आहे. आज जगात देशाचे नाव वाढत आहे. प्रतिष्ठा मिळाली आहे असेही अजितदादा पवार यांनी ठणकावून सांगितले.

# परप्रांतीय राजूने बुजवला रस्त्यावरील खड्डा !

आधुनिक केसरी न्यूज



**सुधीर कोर्टीकर**

**छत्रपती संभाजीनगर :** झारखंडमधून आलेला एक मुलगा. राजू एतकीच त्याची ओळख.आपल्या पुतण्यासह गेल्या वीस वर्षापासून हा राजू सेव्हन हिल्स उड्डाणपूलाजवळ आंबे विकण्याचे दुकान टाकून आंबे विकत आहे. सेव्हन हिल्स रस्त्यावर गेल्या सहा महिन्यांपासून मोठा खड्डापडलेला आहे. त्या मोठ्या खड्ड्यात रोज महिला.. मुलं.. ज्येष्ठ नागरिक वाहनावरुन पडून किरकोळ अपघात घडण्याची रोजचीच बाब झाली.राजूंनी संबंधित बऱ्याच जणांना सांगितले .पण तो पडलेला खड्डा कोणीच बुजविण्यासाठी पुढे येत नाही. हे राजूनी जाणले. मग काल त्यांनी स्वतःच्या पैशाने अडीच हजार खर्च करून तो पडलेला खड्डा वाळू सिमेंटच्या साह्याने बुजवून घेतला.त्याचाही कुठे गाजावाजा नाही. झारखंडमधून आलेल्या राजू आंबेवाल्या माणसानी आपल्या छत्रपती संभाजी नगर शहरा विषयी.. या ठिकाणच्या माणसां विषयी दाखवलेलं हे प्रेम..औदार्य नक्कीच स्पृहणीय.. कौतुकास्पद आहे हे बाकी खरं.

# क्रीडा स्पर्धेत संविधान सोनवणे वर्गात प्रथम

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** श्री छत्रपती अग्रसेन महाराज विद्यालय येथे क्रीडा स्पर्धेत यश प्राप्त विद्यार्थ्यांचे पारितोषिक व विद्यार्थ्यांचा विकास व्हावा यासाठी शैक्षणिक उपयोगी बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला त्याच प्रमाणे बालमंदिर विध्यार्थी संविधान आकाश सोनवणे याचा वर्गात प्रथम क्रमांक आला. याचे सर्वत्र कौतुक होत आहे. याप्रसंगी प्राथमिक मुख्याध्यापक दिनेश मोरे, उप मुख्याध्यापक प्रणव कोतवाल, बालमंदिर मुख्याध्यापिका सुनिता शिरसाठ व पूजा सोनार उपस्थित होते.



# प्रा. डॉ. शिवाजी हुसे यांच्या 'आता युद्ध अटळ आहे' कवितासंग्रहाचे रविवारी प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** त्रैमासिक तिफण, तिफण वाचक चळवळ, आदित्य प्रकाशन, भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद आणि सुखना बचाओ जनआंदोलन संघर्ष समिती यांच्या वतीने प्रा. डॉ. शिवाजी भिकाजी हुसे यांच्या आता युद्ध अटळ आहे या कवितासंग्रहाचे प्रकाशन छत्रपती संभाजीनगर येथे मराठवाडा साहित्य परिषदेत रविवारी (ता. ३१ ) रोजी सायंकाळी ५.३० वा. आयोजित करण्यात आले आहे. या कवितासंग्रहाचे प्रकाशन मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांच्या शुभहस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी उद्योजक तथा श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मानसिंह बाळासाहेब पवार हे रहाणार आहेत. कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले , डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. सर्जेराव जिगे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणाऱ्या या प्रकाशन सोहळ्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य , साहित्यिक व समीक्षक डॉ. राजकुमार एल्लावाड हे पुस्तकावर भाष्य करणार आहेत. प्रा. डॉ. शिवाजी हुसे हे कवी, लेखक, संपादक आणि व्याख्याते असून कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयात प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख  म्हणून कार्यरत आहेत.सातत्याने लेखन करणारे साहित्यिक म्हणून ते सुपरिचीत असून वाङ्मयीन व सामाजिक चळवळीतील सक्रिय कार्यकर्तेही आहेत. या प्रकाशन सोहळ्यास उपस्थित रहावे असे आवाहन भाषा, साहित्य , संस्कृती आणि संशोधन परिषदेचे सचिव तथा तिफण वाचक चळवळ चे अध्यक्ष डॉ. दिलीप बिरुटे, आदित्य प्रकाशनाचे संचालक विलास फुटाणे,डॉ. सुभाष बागल, दत्तात्र्यय डुंबरे ,डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. रुपेश मोरे, अशोकराव काळे , डॉ. बाळासाहेब बेळगे, भाऊसाहेब घुगे, सुरेश जुए पाटील,डॉ. प्रेमला मुखेडकर, डॉ. सुधाकर जाधव, डॉ. यशवंत सोनुने, डॉ. सुखदेव पोटदुखे, डॉ. सत्यशिला तौर, डॉ. राज रणधीर, डॉ. एकनाथ शिंदे, ज्योती सोनवणे, माधुरी चौधरी, सुनील डोके, डॉ. गजानन जाधव ,पांडुरंग गिराम, डॉ. गणेश शिंदे, धनंजय गव्हाले, साईनाथ फुसे, अशोक गायकवाड, प्रविण दाभाडे, अरुण थोरात, ज्ञानेश्वर गायके, संदीप ढाकणे, लक्ष्मण वाल्डे, डॉ. मारोती घुगे, नारायण खरात, अशोक डोरले आदिंनी केले आहे.






# जिल्ह्यात प्रवेश करणाऱ्या वाहनांची कडक तपासणी करा : जिल्हाधिकारी

## पाटाळा आणि वणी येथील चेकपोस्टला भेट

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** संपूर्ण जिल्ह्यात निवडणूक प्रक्रिया शांततेत आणि निःपक्षपणे राबविण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध आहे. आदर्श आचार संहितेची प्रभावी अंमलबजावणी तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्ह्यात विविध पथकांचे गठन करण्यात आले आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून जिल्ह्याच्या सीमेवर तैनात स्थायी निगराणी पथकांनी (एसएसटी) जिल्ह्यात प्रवेश करणा-या वाहनांची कडक तपासणी करावी, असे स्पष्ट निर्देश जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी दिले आहे.

भद्रावती तालुक्यातील पाटाळा आणि वणी मतदारसंघातील सीमेवर असलेल्या चेकपोस्टला जिल्हाधिकारी श्री. गौडा यांनी भेट दिली. यावेळी वरोराच्या उपविभागीय अधिकारी शिवनंदा लंगडापुरे, उपविभागीय पोलिस अधिकारी नयोमी साटम, तहसीलदार योगेश कौटकर (वरोरा), अनिकेत सोनवणे (भद्रावती) आदी उपस्थित होते.

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्ह्यात 16 मार्च 2024 पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या पार्श्वभुमीवर जिल्ह्याच्या सीमेवर स्थायी निगराणी पथक (एसएसटी) तैनात करण्यात आले आहे. पाटाळा (ता. भद्रावती) येथील पथकांची पाहणी करतांना जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, जिल्ह्यात प्रवेश करणा-या प्रत्येक वाहनांची कडक तपासणी झाली पाहिजे. यात कोणताही निष्काळजीपणा करू नये. चारचाकी वाहनाच्या डिक्की सह वाहनाच्या सीट जवळील भागसुद्धा तपासावा. यात असणा-या बॅग्ज व इतर बाबींची तपासणी करावी. काही आक्षेपार्ह आढळल्यास त्याबाबत संबंधित यंत्रणेला माहिती द्यावी. पूर्णपणे खात्री झाल्यावरच संबंधित वाहनाला प्रवेश द्यावा. तसेच तालुक्यातील वरीष्ठ अधिका-यांनी रात्री – बेरात्री चेकपोस्टवर अकस्मिकपणे भेट द्यावी, असे निर्देश दिले.

यावेळी जिल्हाधिका-यांनी वरोरा – वणी मार्गावरील पाटाळा आणि वणी येथील चेकपोस्टला भेट दिली. किती जणांची टीम लावण्यात आली आहे, प्रत्येक टीममध्ये किती लोकांचा सहभाग असतो, प्रत्येक शिफ्टमध्ये काम करणा-यांच्या वेळापत्रक कसे आहे, आदी बाबींची माहिती जाणून घेतली. तसेच दोन्ही चेकपोस्टवरील अधिकारी व कर्मचा-यांनी ऐकमेकांना मोबाईल क्रमांक देऊन ठेवावे, जेणेकरून एखादे वाहन न थांबता सुसाट गेले आणि संशयास्पद वाटले तर त्याची माहिती लगेच दुस-याला देणे शक्य होईल.

वरोरा येथे स्ट्राँग रुमची पाहणी : तत्पुर्वी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी वरोरा येथील कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात असलेल्या स्ट्राँग रुमची पाहणी करून या परिसराला बॅरिकेटींग करावे, तसेच स्ट्राँग रुम सुरक्षेच्या दृष्टीने पोलिस विभागाने विशेष दक्ष राहावे, अशा सुचना त्यांनी दिल्या.

असे आहेत प्रत्येक मतदारसंघनिहाय तैनात असलेले एसएसटी पथक : 13 - चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात एकूण 62 स्थायी निगराणी पथकांचे (एसएसटी) गठन करण्यात आले आहे. यात राजुरा विधानसभा मतदार संघात 15, चंद्रपूर – 4, बल्लारपूर – 6, वरोरा – 12, वणी – 13 तर आर्णी विधानसभा मतदारसंघात 12 पथकांचा समावेश आहे. याशिवाय गडचिरोली लोकसभा मतदारसंघात येत असलेल्या ब्रम्हपूरी विधानसभा मतदारसंघात 8 तर चिमूर मतदारसंघात 4 एसएसटीचे गठण करण्यात आले आहे.

# एमआयडीसीतील कारखान्याला भीषण आग

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** खामगाव येथील 'एमआयडीसी' मधील एका कारखान्याला आज, मंगळवारी दुपारी भीषण आग लागली. या आगीत लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. घटनास्थळी अग्निशमन दल दाखल झाले आहे. खामगाव येथील महाराष्ट्र औद्योगिक वसाहत मधील जगदंबा ऍग्रो इंडस्ट्रीज या प्रकल्पाला दुपारी ३ वाजताच्या सुमारास अचानक आग लागली. पाहतापाहता या आगीने भीषण स्वरूप धारण केले. याची माहिती मिळताच खामगाव नगरपरिषदेसह अन्य ठिकाणचे अग्निशमन दल दाखल झाले. त्यांनी आगीवर नियंत्रणासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले. पाऊण तासानंतर ही आग आटोक्यात आल्याचे सांगण्यात आले. या भीषण आगीत किती नुकसान झाले याची यंत्रणांकडून पाहणी करण्यात येत आहे.

# लेंगी नृत्याद्वारे महिलांनी होलीकोत्सवात भरले रंग

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** येथून हाकेच्या अंतरावर असलेल्या वाढोणा बंजारा तांड्यावर पारंपारिक होलिका उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा झाला. यानिमित्त महिलांनी परंपरागत लेंगी नृत्यद्वारे होली उत्सवात रंग भरले.

होली रंगपंचमी सनानिमित्त वढोना तांडा क्रमांक एक येथे महिलांच्या लैंगिक नृत्याने या उत्सवात आणखीनच रंगत आणली. यानिमित्त बंजारा महिला व मुलींनी पारंपारिक वेशभूषेत लेंगी नृत्य सादर करून होली रंगपंचमी उत्सव साजरा केला. यानिमित्त बंजारा परंपरेनुसार मुलांचा बारशाचा कार्यक्रम ही उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी वाढोणा व बुटखेडा येथील महिलानी बंजारा गीत व डफळ्याच्या तालावर नूंत्य सादर केले.यावेळी डफडा वादक रोहिदास चव्हाण,अरूणा आढे,चागुना आढे,ईदुबाई आढे,ईदुबाई राठोड,चंद्रकला राठोड,मेनका राठोड,पुजा आढे, जिजाबाई राठोड.लता आढे,जोती आढे,शितल राठोड,सावित्रीबाई राठोड,कातांबाई पवार,जनूबाई पवार,मिराबाई चह्वाण,शिलाबाई. चव्हाण,सविता राठोड,कविता चव्हाण,वंदना राठोड,जिजाबाई पवार,शिलताई राठोड.यांच्या सह कॉंग्रेस नेते गणेशराव आढे,राष्ट्रवादी नेते रमेश राठोड,शाम राठोड,राजु राठोड,विलास आढे,भास्कर आढे, रमेश पवार,राजु पवार,बबन आढे. सुशील राठोड. एकनाथ राठोड. राहुल राठोड. बडु आढे.सुभाष आढे. शरद पवार,ताराचंद चव्हाण,राजु चव्हाण,गणेश राठोड आदींनी सहभाग घेतला.



# डॉ. नामदेव उसेंडी यांचा कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष पदाचा राजीनामा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रकांत पतरंगे**

**गडचिरोली :** काँग्रेसच्या महाराष्ट्रातील तिकीट वाटप समितीने माझेकडे निवडणूक लढविण्यासाठी पैसे नसल्याचे कारण सांगून गडचिरोली जिल्ह्याबाहेरील धनदांडग्या माणसाला कांग्रेसची उमेदवारी देऊन जिल्ह्यातील आदिवासी ऊमेदवाराला डावलले त्यामुळे आपण या अन्यायाविरुद्ध महाराष्ट्र प्रदेश आदिवासी काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष पदाचा राजीनामा देत आहोत, अशी घोषणा माजी आमदार डॉ. नामदेव उसेंडी यांनी आज मंगळवारी त्यांचे निवासस्थानी आयोजित पत्रकार परिषदेत केली. यामुळे ऐन निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कांग्रेस मध्ये खळबळ उडाली आहे. उल्लेखनीय आहे की चार दिवसांपूर्वी कांग्रेसचे प्रदेश सचिव डॉ नितीन कोडवते दाम्पत्याने कांग्रेसला रामराम करून भाजपचे कमळ हाती घेतले.



पत्रकार परिषदेत उसेंडी म्हणाले की मी महाराष्ट्र प्रदेश आदिवासी काँग्रेसचा प्रदेशाध्यक्ष या पदावर कार्यरत होतो. नेमणूकीनंतर संपूर्ण महाराष्ट्रात आदिवासी काँग्रेस पक्षाचा संघटन करण्याचा प्रयत्न केला काँग्रेसच्या माध्यमातुन आदिवासींना न्याय मिळेल अशी अपेक्षा होती, मी गडचिरोली जिल्हयाचा स्थानिक उमेदवार म्हणुन पक्षाकडे गडचिरोली- चिमुर या लोकसभा क्षेत्राची उमेदवारी मागितली होती, स्थानिक व राज्य पातळीवरचे माझा काम पाहून उमेदवारी मिळेल अशी अपेक्षा होती, परंतू स्थानिक व राज्य पातळीच्या काँग्रेसच्या नेतृत्वाने षडयंत्र करुन या लोकसभा क्षेत्राच्या बाहेरील व्यक्तीला गडचिरोली - चिमुर लोकसभा क्षेत्राची उमेदवारी दिली. घटनेच्या तरतुदीनुसार गडचिरोली-चिमुर लोकसभा क्षेत्राचे स्थानिक आदिवासींची लोकसंख्या गृहीत धरुन या भागातील प्रश्न व समस्या लोकसभेत मांडून सोडविले जातील, हा उद्देश होता, अशी संकल्पनादृष्टीस ठेऊन गडचिरोली चिमूर लोकसभा क्षेत्र आदिवासीसाठी आरक्षित ठेवण्यात आलेला होता.

या संकल्पनेला छेद देवून प्रदेश पातळीवरील नेत्यांनी आपसी गटबाजी आणि कुरघोडीच्या राजकारणात माझ्यासारख्या कार्यकर्त्याचा बळी घेऊन गडचिरोली जिल्ह्याबाहेरील व्यक्तीला उमेदवारी दिल्याने स्थानिक नेतृत्वावर अन्याय झालेला आहे. माझ्या सारख्या पक्षासाठी रात्र-दिवस मेहनत करण्या-या कार्यकर्त्याला कॉंग्रेसचे स्थानिक व राज्यपातळीवरील नेतृत्व गटबाजीने ग्रस्त असल्यामुळे न्याय देवू शकत नसेल तर या क्षेत्रातील लोकांना न्याय कसा मिळेल या बाबीचा विचार करुन महाराष्ट्र प्रदेश आदिवासी काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष पदाचा राजीनामा देत आहे असे ते म्हणाले.

उसेंडी यांनी २०१४ व २०१९ या दोन्ही लोकसभा लढवल्या होत्या. परंतू ते अपयशी ठरले. पूढे कांग्रेस ने दोन्ही विधानसभा निवडणुकीत डॉ. उसेंडींना डावलून मतदारसंघाच्या बाहेरच्या उमेदवारांना तिकिट दिले त्यामुळे पक्ष सातत्याने बाहेरच्यांना उमेदवारी देत असल्याचा आरोपही त्यांनी केला. आपल्या राजीनाम्याने कांग्रेस पक्षावर काहीही फरक पडणार नसल्याचे त्यांनी उपरोधिकपणे सांगितले. उसेंडी पुढे म्हणाले की कांग्रेस नेत्यांकडून नाराजी दूर करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. परंतु लबाडांच्या आश्वासनांवर आता माझा विश्वास राहिलेला नाही. मागील दोन्ही विधानसभा निवडणुकीत मला आश्वासन देऊन मतदारसंघाबाहेरचे उमेदवार देऊन पक्ष संघटन कमजोर केले. आता जर खरोखरच माझी नाराजी दूर करायची असेल तर लोकसभेचा किंवा आगामी विधानसभेचा एबी फार्म माझेकडे द्यावा. पत्रकार परिषदेला कांग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष बंडोपंत मल्लेलवार उपस्थित होते. त्यांनस्थानिक नेते आणि कार्यकर्ते यांना विश्वासात न घेणाऱ्या कांग्रेसचा आजच पराभव दिसत असल्याचे म्हटले आहे

## ग्रामीण भागातही रंगू लागल्या लोकसभेच्या निवडणुकीच्या चर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सावळदबारा परिसरात सध्या लोकसभा निवडणुकीचे बिगुल वाजले असून निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्याने ग्रामीण भागात तालुका स्तरावरील नेत्याच्या गाडया वाडी -वस्तीवर दिसू लागल्या आहेत. लोकसभाची मुदत संपल्याने निवडणूक आयोगाने लोकसभाच्या निवडणूक कार्यक्रम घोषित करण्यात आल्या असल्याने वरिष्ठ पातळीवर अनेक पक्षांमध्ये युती करून जागा वाटप करून आपआपल्या पक्षाच्या उमेदवारांच्या नावाची घोषणा करण्यात आल्या असल्याने पक्षश्रेष्ठकडून पक्षाच्या कार्यकर्त्यांना कामा लागण्याचे आदेश दिल्याने सध्या लग्न सराईच्या हंगाम चालू असून त्यामुळे लग्ना स्थळी अनेक नेते हजेरी लावताना दिसून येत आहे.यात बाहेर गावाहून पाहुण्याचीहि गर्दी होत आहे.या विवाह समारंभाच्या ठिकाणी पिण्याचे पाणी, विहिरीचे पाणी, आणि शेतातील पिकाची आदी गोष्टी बरोबर निवडणुकीवर चर्चा होते.यात पक्षाने दिलेला उमेदवार, उमेदवारी न मिळाल्याने दुसऱ्या पक्षात प्रवेश करून केलेली उमेदवारी, आदी विषयावर चर्चा रंगताना दिसून येत आहे. यात प्रत्येक पक्षाचा कार्यकर्ता हा आपल्या पक्षाची भूमिका मांडतो. आपला पक्ष सत्तेवर असतांना काय कामे केली होती. काय कामे करणार आहे.यात विरोधी पक्षाच्या कार्यकर्ता सत्तेवर असतांना काय चुका केल्या हे मांडत आपला पक्षा काय कामे करणार हे पटविताना दिसून येत आहे. यामुळे काही वेळा दोन पक्षाच्या कार्यकर्त्या मध्ये वाद-विवाद विकोपास जातात.त्यामुळे त्याच्यामध्ये शाब्दिक चकमक होतात. तेव्हा कोणाला तरी मध्यस्थित करून यावर पडदा पाडवा लागतो. गेल्या काही महिन्यांपासून ओस पडलेल्या गावातील चौका-चौकात,वाडी वस्ती, लोक सायंकाळी-सकाळी एकत्र होऊन या निवडणुकीवर चर्चा होता दिसून येत आहेत. त्यामुळे चौका- चौकात गर्दी जमा होऊ लागली आहे.आणि या निवडणुकीत कोणता उमेदवार जिकणार आणि कोणता पक्षाला किती जागा मिळणार याचे आराखडा तयार केला जाऊ लागला आहे. या निवडणुकीत तरुण वर्ग जास्त प्रमाणात उत्साहित सोयगाव तालुक्यात दिसत आहे.



## सावळदबारा येथे होळी, धुलिवंदन उत्साहात साजरे

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरातील गावांमध्ये आणि परिसरात होळी आणि धुलीवंदन सण उत्साहात साजरे करण्यात आले. यावर्षी आबालवृद्धांच्या सहभागाने उत्सवात मोठीच रंगत आली होती.

रविवारी सायंकाळी घरोघरी होळी पेटविण्यात आली. तर काही गावांतील सार्वजनिक मंडळांनी सार्वजनिक होळी साजरी केली. सायंकाळी सहा वाजल्यानंतर विधिवत होळीचे पूजन केले. गोवऱ्या, लाकडे टाकून होळी पेटविण्यात आली. त्यानंतर आबालवृद्ध, महिला व तरूणाईने होळी भोवती गोल फेरा मारून पूजा करून पुरणपोळीचा नैवेद्य अर्पण केला. सोमवारी सकाळी नऊ वाजल्यापासून लहान मुले, तरुण हातात रंग घेऊन धुलीवंदन उत्साहात साजरा करीत होती. शाळांना सुट्ट्या असल्याने मुलांमध्ये मोठा उत्साह होता. ओल्या आणि कोरड्या रंगाच्या यावेळी मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात आला.काही तांड्यावस्तीमध्ये डीजे लावला होता. दुपारी दोन वाजेपर्यंत हा उत्साह कायम होता. लोकसभेसाठी आचारसंहिता असल्याने राजकीय कार्यकर्ते, नागरिक, मुलांचा तरुणांचा सहभाग या वर्षी मोठ्या प्रमाणात सावळदबारा परिसरात दिसून येत होता.

## प्रवाशांना आपुलकीची पुरणपोळी देऊन मानवता धर्म पाळला : शेख

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** माणसाने माणसांची मने जाणली कि एकमेकांचा स्नेह वाढतो. सण, उत्सव साजरे करताना मानवता हा एकमेव धर्म मानला तर जात-पात याला थारा राहणार नाही. प्रवाशांत सर्व समाजाचे लोक एकत्रित प्रवास करतात. निमित्त होळीचे.... प्रवाशांना देणे आपुलकीचे पुरण पोळीचे उपक्रमातून रेल्वे प्रवाशांना पुरणपोळी देऊन मानवता धर्म पाळला, असे प्रतिपादन झेबा शेख यांनी केले.

नगर येथील सायंतारा ग्रुप व स्नेह 75 च्या संयुक्त विद्यमाने होळी उत्सव साजरा करुन नगर येथील रेल्वे स्थानकावर जाऊन प्रवाशांना आपुलकिची पुरणपोळी देऊन त्यांना या होळी सण-उत्सवात सहभागी करुन घेतले. यावेळी डॉ.अस्मिता अष्टेकर, आरती खाडीलकर, अजित चाबुकस्वार, प्रमोदकुमार छाजेड, गुलाब गोरे तसेच ग्रुपचे सदय्य उपस्थित होते. यावेळी पूजा पवार म्हणाल्या, प्रवासी हा एका राज्यातून दुसर्या राज्यात, या जिल्ह्यातून दुसर्या जिल्ह्यात जात असतात. प्रवासात सण, उत्सव साजरे करता येत नाही. फास्टफूड शिवाय काही खायला मिळत नाही. होळी सणाच्या निमित्ताने गोड पुरणपोळी प्रवाशाना देऊन सणाचा आनंद द्विगुणित करण्यासाठी आम्ही छोटासा हा प्रयत्न केला. प्रास्तविकात ईश्वर सुराणा यांनी स्नेह 75 च्या माध्यमातून बंधूभाव जोपासित विविध उपक्रम राबविणे एकमेकांविषयी स्नेह, प्रेम निर्माण करुन ते टिकविणे हा उद्देश असल्याचे सांगितले. प्रवाशांनी गरम-गरम गोड-धोड पुरणपोळीचा आस्वाद घेत समाधान व्यक्त केले. सूत्रसंचालन दिनेश गुगळे यांनी केले तर दिलीप कानडे यांनी आभार मानले.



## गुन्हेगारांकडे आढळले ५ पिस्तूल, ९ काडतूस

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** आचारसंहिता लागल्यानंतर पोलीस आयुक्तांनी आठवडाभर विशेष मोहिम राबवून भारतीय शस्त्र अधिनियम कायद्याअंतर्गत ४६ शस्त्र जप्त केली. यामध्ये ५ पिस्तूल आणि ९ जिवंत काडतुसाचा समावेश आहे. पोलीस आयुक्तांच्या आदेशानंतरही शहरात गुन्हेगार पिस्तूलाचा वापर करीत असल्याचे या कारवाईवरून स्पष्ट होते. त्यामुळे गुन्हे शाखेची पथके आणि गोपनीय विभागाचे ‘नेटवर्क’ कमकुवत असल्याचे दर्शवते. पोलीस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांनी आचारसंहिता सुरु झाल्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून परवानाधारक शस्त्र सुद्धा जमा करण्याचे आदेश दिले होते. तसेच शहरातील गुन्हेगारांच्या टोळ्यावर लक्ष केंद्रित करून पिस्तूल वापरणाऱ्या गुन्हेगारांवर कडक कारवाई करण्याचे आदेश पोलीस आयुक्तांनी दिले होते. मात्र, पोलीस आयुक्तांच्या आदेशाला अनेक ठाणेदार गांभीर्याने घेत नाहीत. त्यामुळेच गुन्हेगार पिस्तूल, तलवारी-चाकूसारखे शस्त्र घेऊन समाजात दहशत पसरवित असतात.

# रिसोड तालुक्यात आगीच्या दोन घटनेत लाखोंचे नुकसान

## घरातील साहित्यासह शेतोपयोगी साहित्यांचे लाखोंचे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** तालुक्यातील आसोला आणि नेतन्सा या दोन गावामधे रात्रीच्या सुमारास वेगवेगळ्या ठिकाणी आगीमध्ये लाखो रुपयांचे नुकसान झाले.या मधे आसोलां येथील संदीप पाचरणे यांच्या शेतातील गोठ्याला अंदाजे सकाळी 6 वाजताच्या दरम्यान आग् लागून जवळपास दहा लाख रुपये रकमेचे शेतोपयोगी साहित्य तसेच शेतमाल यामधे जाळून आगीच्या भक्ष्यस्थानी पडले या मधे बियाण्यांसाठी ठेवलेली पंधरा पोते सोयाबीन,तसेच तुर 6 पोते स्प्रींकलर पाईप, ठिबक, दूरदर्शन संच, विहिरीतील मोटर पंप, इंजन, टिन पत्रे,रिकामे पोते, पलंग, विद्युत केबल, डीएपी खताची पोते आदी सह इतर बरेच घरगुती,तसेच शेतोपयोगी साहित्य यामधे जाळून खाक झाले सदर घटनेची माहिती रिसोड येथील अग्नीशमण विभागाला दिली असता अग्नीशमन येई पर्यंत बरेच साहित्य जाळून खाक झाले. झालेल्या घटनेची माहिती महसूल विभागाचे तलाठी धांडे यांना दिली असता त्यांनी सकाळीच घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून सदर पंचनामा रिसोड तहसीलदार यांचेकडे सादर करण्यात आला आहे.

तसेच ग्राम नेतंसा येथे सकाळी 3 वाजे दरम्यान शेख सय्यद महेबुब सय्यद अनिल यांच्या जनावरांच्या गोठ्याल शॉर्ट सर्किटमुळे अचानक आग लागून गोठ्यातील दोन बैल भाजली असून अनेक शेतोपयोगी साहित्य ज्यामधे शेतात काम करण्यासाठी वापरण्यात येणारे औजारे, गोठ्यावरील टिन पत्रे, जनावरांचा कडबा, कुटार देखील जाळून खाक झाले यामधे त्यांचे जवळपास दोन लाख रुपये रकमेचे नुकसान झाले असून त्या गोठ्या ला लागूनच असलेले बक्षी बागबान यांचे राहते घराला देखील आग लागली घरातील सर्वच जन साखर झोपेत असल्याने आगीने रौद्र रूप धारण केले होते यांचे देखील घरातील धान्य,तसेच इतर दैनंदिन गरजेच्या वस्तू जळून भस्म झाल्या यांचे देखील जवळपास तीन लाख रुपयांचे नुकसान झाले. एकदरित रिसोड तालुक्यातील दोन्ही गावामधे लागलेल्या आगीमध्ये लाखोंचा ऐवज भस्म झाला असून सदर नुकसान झालेल्या कुटुंबांना शासकीय आर्थिक मदत मिळावी अशी मागणी करण्यात येत आहे.





# वाळूचोरांची प्रतिबंधक पथकास शिवीगाळप्रकरणी कामबंद आंदोलन

## आरोपींना त्वरित अटक करा व पथकासोबत एक शस्त्रधारी पोलीस नियुक्त करण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** अवैध रित्या वाळू वाहतूक करणाऱ्यावर नजर ठेवण्यासाठी नेमणूक केलेल्या पथकाने अवैधरित्या वाळू वाहतूक करणाऱ्या एका वाहनास पकडल्याने त्याचा राग मनात धरून वाळू तस्करी करणाऱ्यांकडून पथकातील कर्मचारी व तहसीलदार संदीप कुमार भोसले यांना शिवीगाळ व दमबाजी केल्याचा प्रकार दि २३ मार्च २०२४ रोजी रात्री घडला त्यानुसार कोपरगाव तालुका पोलीस स्टेशनमध्ये ३ जणांचे विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र अद्याप पर्यंत कोणसही अटक झालेली नसल्यामुळे महसूल कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन पुकारले आहे. शिर्डीचे अप्पर जिल्हाधिकारी यांना कोपरगाव तालुका महसूल सहायक संघटनेच्या वतीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार जिल्यातील गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीस प्रभावीपणे आळा घालण्यासाठी कार्यपद्धती ठरवून दिलेली आहे. सदर अवैध गौणखनिज उत्खनन नियंत्रणासाठी वेळोवेळी भरारी पथकाबाबत आदेश होत असतात. यामध्ये महसूल विभागातील तलाठी, मंडलाधिकारी, अव्वल कारकून, महसूल सहाय्यक, कोतवाल काम करत असतात त्यानुसार तहसीलदार यांचे मार्गदर्शनाखाली दि २३ मार्चला कर्तव्यावर असणाऱ्या पथकाला रात्रीच्या सुमारास अवैध वाळू वाहतूक करणारे एक वाहन कुंभारी वनविभागाचे जमिनीतून रस्त्यावर हिंगणी कडे जातांना आढळून आले. हा टाटा कंपनीचा टेम्पो क्र. एम एच ०४ इएल ९३३५ त्यामध्ये वाळू भरून जात असताना मिळून आला. त्याला अडवून अवैध रित्या वाळू वाहतूक करतांना आढळून आल्याने कारवाई करणे कामी कोपरगांव तहसील कार्यालय येथे घेऊन आले असता. चालक बाबासाहेब शिवाजी जाधव, रा शिंगणापूर याने अझर इस्मौद्दिन शेख, रा गांधीनगर, कोपरगाव व तुषार दीपक दळे रा.कोपरगाव यांना बोलावून घेतले व सोबत इतर इसमांना बोलावून घेऊन मोठा जमाव जमा झाला व तहसील कार्यालयाचे आवारात पथका सोबत हुज्जत घालत " तुम्ही पैसे घेत नाही का, तुम्ही आमचा वाळू वाहतूक करणारा टेम्पो कार्यालयात का आणला तो लगेच सोडवा नाहीतर तुम्हाला इथे नोकरी करू देणार नाही" अशी धमकी देत दमबाजी केली व चापटीने मारहाण केली. त्याच बरोबर पथकातील कर्मचाऱ्यांनी आपले वरिष्ठ अधिकारी तहसीलदार भोसले यांना संपर्क साधून कोपरगांव तहसील कार्यालय येथे बोलावले असता तहसीलदार यांना देखील सदर इसमांनी शिवीगाळ करत दमबाजी केली. व सरकारी कामात अडथळा आणला. सदर घटनेची तक्रार कोपरगाव तालुका पोलीस स्टेशन मध्ये फिर्यादी तलाठी गणेश वाघ यांनी दिली आहे. दोषींना त्वरित अटक करून येथून पुढे एक शस्त्रधारी पोलीस रात्रीच्या गौण खनिज नियंत्रण करणाऱ्या पथकासोबत कायमस्वरूपी द्यावा. या आंदोलनात महसूल चे तलाठी, मंडलाधिकारी, महसूल सहाय्यक व अव्वल कारकून तसेच शिपाई, कोतवाल या सर्वांनी दिनांक २६ मार्च २०२४ पासून काम बंद आंदोलन पुकारले आहे. यावरून वाळूमाफियाची मुजोरी किती वाढलेली आहे हे दिसून येत आहे. तहसीलदार व शासकीय कर्मचारी यांनाच जर वाळू तस्कर शिवीगाळ व दमबाजी करत असतील तर इतरांचे काय ? असा प्रश्न या निमित्ताने नागरिकांनी उपस्थित केला आहे. यावर आता पोलीस प्रशासन काय निर्णय घेते हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# जिल्हा परिषद प्रशाला चिखलठाण शाळेतील विद्यार्थ्यांचे मतदार जनजागृती अभियान

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने १००% मतदान व्हावे याकरिता मतदार जनजागृती अभियानांतर्गत जिल्हा परिषद प्रशाला चिखलठाण तर्फे मतदार जनजागृती होण्याकरिता शनिवार २३ मार्च रोजी प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले. प्रत्येक नागरिकांनी मतदान करणे गरजेचे आहे व त्याकरिता शासन विविध स्तरावर जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत.लोकशाहीच्या मतदान प्रक्रिया,राष्ट्रसेवेमध्ये शाळेतील विद्यार्थ्यांचाही समावेश असावा अशा उदात्त हेतूने मतदार जनजागृती करिता प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले. प्रशालेतील इयत्ता 7 वी आणि 8 वितील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ठ मतदार जनजागृती विषयावर पथनाट्य सादर केले आणि उपस्थितांचे मन जिंकले. SVEEP पथकाचे प्रमुख योगेश पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.तसेच प्रवीण दाभाडे यांनी मतदार जनजागृती पर गीत गायन केले. भाऊसाहेब सोननीस सर यांनी गीताला साथ दिली.

यावेळी 'मतदान करा सर्व नर आणि नारी, ही आहे प्रत्येक मतदाराची जबाबदारी', 'देशाचे भाग्यविधाते व्हा, नागरिकहो, जागरूक होऊन मतदार यादीत नाव नोंदवा','मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो', 'वृद्ध असो की जवान, सर्वजण करा मतदान' अशा जनजागृतीपर घोषणा विद्यार्थ्यांनी दिल्या. शाळेने राबवलेल्या या उपक्रमाबाबत पालकांनीसुद्धा विद्यार्थी व शिक्षकांचे कौतुक केले.नागरिकांनी यास भरभरून प्रतिसाद दिला. शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रमोद चव्हाण ग्रामपंचायत सरपंच शिवाजी धनेधर , प्रताप चव्हाण, योगेश पेहेरकर, राजेंद्र चव्हाण, शेकनाथ चव्हाण, ग्रामसेवक जाधव साहेब उपस्थित होते. या वेळी शिक्षक गणेश गाढे,ज्ञानेश्वर इस्तापे, राजेंद्र शेलार,साहेबराव मोरे, श्री.विजय सोनवणे श्रीम.काळे, श्रीम .बाविस्कर,श्रीम.माढेकर यांसह शिक्षकांनी या प्रभात फेरीचे उत्तम नियोजन केले होते.



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# बसची दुचाकीला धडक; एक जण ठार

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** सिल्लोड रस्त्यावरील पाल फाट्याजवळ बसने दुचाकीला जोराची धडक दिली. यात एक जण ठार, तर एक जण गंभीर जखमी झाला. सदर अपघात शुक्रवारी (२२ मार्च) दुपारी साडेतीन वाजता घडला. सुभाष केशवराव सोनवणे (४२) असे या अपघातात ठार झालेल्या, तर दिगंबर सांडू डकले (४०, रा. डोंगरगाव कवाड, ता. फुलंब्री) असे गंभीर जखमीचे नाव आहे. सुभाष सोनवणे व दिगंबर डकले हे दोघे डोंगरगाव कवाड येथून पाल येथे दुचाकीने (एमएच २० बीडब्ल्यू ७६४५) जात असताना पाल फाटा येथे यावलहून पुण्याकडे जाणाऱ्या बसने (एमएच १४ बीटी ३९१९) या दुचाकीस पाठीमागून जोराची धडक दिली. यात दुचाकीवरील दोघांनाही जबर मार लागला. त्यांना फुलंब्री ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचार करून रुग्णवाहिकेद्वारे चालक विजय देवमाळी याने पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात दाखल केले. उपचार सुरू असताना सायंकाळी ६ वाजता सुभाष सोनवणे यांचा मृत्यू झाला, तर दिगंबर डकले यांच्यावर घाटी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. फुलंब्री पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

# २८ लाखांचा मद्यसाठा पोलिसांकडून जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर गडचिरोली पोलिसांनी अवैध मद्यविक्रीवर कारवाईचा बडगा उगारला असून चामोर्शी तालुक्यातील जंगमपूर जंगल परिसरातून तब्बल २८ लाखांचा मद्यसाठा जप्त केला. कारवाईची कुणकुण लागताच तीन आरोपी फरार होण्यात यशस्वी झाले. गडचिरोली जिल्ह्यात दारूबंदी असूनही अनेक ठिकाणी छुप्या मार्गाने अवैध विक्री सुरूच असते. यामुळे अनेकदा कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. जिल्ह्यात सद्या लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून त्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी अवैध दारूविक्री विरूद्ध कडक पावले उचलली आहे. दरम्यान, चामोर्शी तालुक्यातील जंगमपुर जंगल परिसरात मोठ्यात प्रमाणात मोहफुलापासून दारू निर्मिती करण्यात येत होती. यासंदर्भात गोपनीय माहिती मिळताच पोलिसांनी त्याठिकाणी धाड टाकून कारवाई केली.

यावेळी दारूविक्री करणाऱ्या जुगल लखन दास, देवदास किसन मंडल, सुब्रातो विश्वास व इतर (रा. नेताजी नगर) या तिघांनी तेथून पळ काढला. चामोर्शी पोलीस ठाण्याचे निरीक्षक पुल्लरवार, उपनिरीक्षक राधिका शिंदे यांच्या पथकाने परिसराची झडती घेतली असता दारू काढण्यासाठी साठवून ठेवलेला तब्बल २८ हजार लिटर मोहसडवा आढळून आला. बाजारभावनुसार या मालाची किंमत २८ लाख इतकी आहे.

मागील अनेक दिवसांपासून जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अवैध दारूविक्री वाढली होती. या कारवाईमुळे दारू तस्करांचे धाबे दणाणले आहे. समोर होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीत मोठ्या प्रमाणात अवैध दारूविक्रीची शक्यता लक्षात घेता पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांच्या आदेशानुसार पोलिसांनी ठिकठिकाणी याविरोधात मोहीम सुरू केली आहे.



# करजगाव येथे कृषी कन्यांच्या मार्फत शेतकऱ्यांची कृषीविषयक जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** तालुक्यातील करजगाव येथे कृषी कन्यांकडून शेतकऱ्यांना कृषी विषयक उपयुक्त मार्गदर्शन करण्यात येऊन कृषी विषयक जनजागृती करण्यात आली. महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी अंतर्गत, मुळा एज्युकेशनच्या कृषि महाविद्यालय, सोनई येथील कृषिकन्यांनी ग्रामीण कृषी जागरुकता आणि कृषी औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रमाच्या माध्यमातून कृषीशी संबंधित वेगवेगळ्या क्षेत्रांचे, आधुनिक शेती, शास्त्रीय शेती यावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमांतर्गत प्लान्टिक्स ( पिकांवरील रोगाचे कारण व रोग नियंत्रण ),ग्रामोफोन (शेतीमाल लागवडी पासून विक्रीपर्यंत सर्व माहिती ), इफको किसान या इंटरनेट ॲपविषयी माहिती दिली.तसेच माती परीक्षण , जनावरांना लसीकरण,बीजप्रक्रिया,फळबाग देखभाल, बोर्डो पेस्ट इत्यादी विषयांची प्रात्यक्षिकेद्वारे माहिती दिली. दुधापासून वेगवेगळे पदार्थ बनवण्याची प्रक्रिया, केळीपासून चिप्स यांची प्रात्यक्षिके महिलांना करून दाखवली.वेळोवेळी शेतकऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नांचे निराकरण करण्यात आले उपयुक्त मार्गदर्शन केल्याबद्दल शेतकऱ्यांनी कृषिकन्यांचे कौतुक केले. यावेळी कृषिकन्या निकिता साबळे,विशाखा मडके सोनाली पटेकर, प्रसन्ना पवार, प्रतिक्षा ठाणगे यांच्या समवेत सरपंच सौ.अनिता गायकवाड, उपसरपंच सतिश फुलसौंदर, भिमराज गायकवाड, कृषिमित्र धनंजय कंक, भगवान जगताप, संतोष हासे, सुभाष ढोबळे व गावातील सर्व शेतकरी उपस्थित होते. सदर कृषिकन्यांना सोनई कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एच. जी. मोरे, उपप्राचार्य प्रा. एस. व्ही. बोरुडे, कार्यक्रम समन्वयक डॉ. ए. ए. दरंदले व कार्यक्रम अधिकारी डॉ.पी.आर.गिरी यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्ताने नेवासा येथे नियोजन बैठक

## सार्वजनिक वर्गणी गोळा न करता होणार जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर नेवासा येथे पंचायत समितीच्या प्रांगणात नियोजन बैठक नुकतीच पार पडली,वर्गणी गोळा न करता स्वाभिमानी अशी जयंती साजरी करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. सदर झालेल्या नियोजन बैठकीत कुठल्याही प्रकारची सार्वजनिक वर्गणी गोळा न करता , स्वाभिमानी अशी जयंती साजरी करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. तशी जयंती ही समाजाची मोट (एकत्र) बांधण्याचे काम करते, वर्षभर आपण शिका, संघटित व्हा,संघर्ष करा,या बाबासाहेबांच्या विचारांवर चालतच असतो. पण एक दिवस 'नाचून ' आपल्या बापाच्या जन्माचा उत्सव साजरा करूया असे ठरले. बाबासाहेबांची जयंती म्हणजे म्हणजे फक्त नाचणे ,असा याचा अर्थ होत नाही तर या नाचण्यातून सामाजिक प्रबोधन , योग्य ध्येयधोरणे , समाजाची एकजूट , कुठ छोट्याश्या गावात जयंती निघत नसेल तर त्या मनांना ही बाबासाहेबांची जयंती काढण्यासाठी प्रेरणा देणारी ही जयंती असल्याचे बहुजन समाजाचे युवा नेते संजय सुखदान यांनी सांगितले.

जेव्हा संकटे आले की समाज आठवतो, चळवळीने आपल्या पाठीमागे उभे राहवे वाटते,पण तुमचं पण काही कर्तव्य आहे की नाही समाजाप्रती ,चळवळीप्रती ते कर्तव्य पुर्ण करा तुमचा हातभार तर लागेलच पण भविष्यात तुमच्यामागे समाज उभा राहील असा संदेश यावेळी विविध वक्त्यांनी भाषणातून बोलताना दिला. यावेळी झालेल्या बैठकीत संजय सुखधान,भास्कर मामा लिहिणार,बाळासाहेब केदारे,सुशील धायजे,मुन्ना शेख ,साजिद पठाण, संजय बनसोडे,शंकर काळे, नितीन भालेराव,नितीन केदारी, राहुल सूर्यवंशी,नितीन दळवी, निखिल चंदानी,नितीन दळवी, बाळासाहेब सातुरे , रंजन जाधव, उमेश ठाणगे ,सार्थक परदेशी ,अजित सिंग नरुला यांच्यासह अनेक कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. सदर बैठकीत जयंती कार्यक्रमाची रूपरेखा पुढील प्रमाणे ठरली .ती पुढीलप्रमाणे दि.१४ एप्रिल २०२४ सकाळी १०.०० वा. पंचायत समिती समोर



अभिवादन कार्यक्रम आणि सायंकाळी ७ ते रात्री १० वाजेपर्यंत बस स्टँड परिसरात भव्य असा डी जे स्टॅंडिंग शो अशी असून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती नेवासा तालुका असे नाव देऊन जयंती साजरी करण्यात येणार असल्याचे बैठकीत सर्वानुमते ठरले.



# बदामबाई विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या मतदार जागृती रॅलीला नागरिकांचा प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे निर्देशानुसार शनिवार दि.२३ मार्च रोजी नेवासा येथील तालुका विद्या प्रसारक संचलित कै.सौ.बदामबाई धनराजशेठ गांधी विद्यालयाच्या वतीने काढण्यात आलेल्या मतदार जनजागृती रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सदर रॅलीत मतदानाचे महत्व सांगणाऱ्या घोषणा विद्यार्थ्यांनी दिल्या.बदामबाई विद्यालयाच्या प्रांगणातून मतदार जनजागृती रॅलीची सुरुवात करण्यात आली सदरची रॅली खोलेश्वर गणपती चौक,नेवासा नगरपंचायत चौक मार्गे नेवासा शहरातील बाजारपेठेत गेली, श्रीरामपूर रोड वरून पुन्हा शाळेत आली. या रॅलीमध्ये विद्यार्थ्यांनी मतदार जनजागृतीचे विविध फलक हातात घेऊन घोषणा देऊन सर्व मतदारांना आकर्षित केले व मतदानाविषयी जनजागृती केली. या रॅलीत बदामबाई विद्यालयाचे मुख्याध्यापक विश्वनाथ नानेकर, शिक्षक राजेंद्र नाईक,रविकांत मरभळ, प्रशांत खंडाळे, संजय चौधरी,बाबासाहेब दहातोंडे, शिक्षिका अनुराधा वाळुंजकर,लता निकाळे,सुरेखा चौगुले, सुलभा ऊंडे यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी रमेश कुलकर्णी,कृष्णा गवळी,राजेंद्र पटारे,सुभाष गोरे आदी सहभागी झाले होते.



# लघु सिंचन प्रकल्पाची दुरावस्था

## वाढलेल्या झाडांमुळे भिंतीला तडे : कालव्याची दयनीय अवस्था

आधुनिक केसरी न्यूज



**वसंत पाटील**

**वाशिम :** तालुक्यातील गणेशपुर (पाचंबा) येथील लघु सिंचन प्रकल्पाच्या भिंतीवर मोठ्या प्रमाणात झाडे, झुडपे वाढल्यामुळे भिंतीला तडे गेले आहेत. तद्वतच धरणाखालील रस्ता नादुरुस्त असून, कालव्यांची सुद्धा दयनीय अवस्था झालेली आहे. परिणामी संपुर्ण प्रकल्पाची झालेली दुरवस्था गणेशपुर, पाचंबा येथील गावकऱ्यांसाठी धोकादायक ठरत आहे. सदर काम तातडीने दुरुस्त करून देण्याची मागणी गणेशपुर ग्राम पंचायतने मृद व जलसंधारण विभागाकडे केली आहे.

येथील लघु सिंचन प्रकल्प कार्यान्वित होऊन जवळपास पंचवीस ते तीस वर्षांचा कालावधी लोटला आहे. मात्र संबंधीत विभागाच्या दुर्लक्षामुळे प्रकल्पाच्या भिंतीवर मोठमोठी झाडे, झुडपे वाढली आहेत. परिणामी प्रकल्पाच्या भिंतीला तडे गेले असून दुरावस्था झालेला प्रकल्प संबंधीत गावकऱ्यांसाठी धोकादायक झाला आहे. शिवाय सदर प्रकल्पातून शेतीच्या सिंचनासाठी काढण्यात आलेल्या कालव्यांची अत्यंत दयनीय अवस्था झालेली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची डोकेदुखी वाढली असून, कालव्याची गत असून अडचण नसून खोळंबा अशी झाली आहे.

नैसर्गिक शेतीवर अवलंबून असणारा शेतकरी हा कायमचा अंदरबट्ट्यात असतो हे अलिखित सत्य सर्वश्रुत आहे. त्यासाठी शाश्वत सिंचन सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने विविध विभागांमार्फत अनेक उपक्रम राबविले आहेत. सदर कामांसाठी हजारो करोड रुपये खर्ची घातले आहेत. त्या अनुषंगानेच गणेशपुर लघु सिंचन प्रकल्पाची निर्मिती करण्यात आली आहे. परंतु सबंधीत विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे शासनाच्या स्तुत्य हेतूची वाट लागली आहे. गेल्या अनेक वर्षापासून प्रकल्पातून काढण्यात आलेल्या सिंचन कलाव्यांकडे संबंधीत विभागाचे दुर्लक्ष होत आहे. परिणामी कालव्यांची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. ठिकठिकाणी मुख्य कालवा फुटला असून अनेक ठिकाणचे बांधकाम पालथे पडले आहे. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांचा कलाव्यापासून फायदा कमी आणि नुकसान जास्त होत आहे. मुख्य कालव्यापासून निघालेल्या उपकालव्याची गत तर त्याहीपेक्षा बिकट झाली आहे. सदर कालव्यात काटेरी झाडं, झुडपं व गवत मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे कालवा ओळखायला येणे दुरापास्त झाले आहे. शिवाय पाचंबा येथील शेतकऱ्यांना सिंचनासाठी उपयोगी पडणारा नाला गाळला गेला असल्यामूळे शेतकऱ्यांच्या अडचणीत आणखीनच भर पडली आहे. तसेच प्रकल्पाच्या देखरेखीसाठी व शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी तयार करण्यात आलेला रस्ता उखडून गेला आहे. परिणामी संबंधीत शेतकऱ्यांना कमालीचा त्रास सोसावा लागत आहे. या बाबत गणेशपुर _ पाचंबा गट ग्राम पंचायतीच्या वतीने सर्वानुमते ठराव घेऊन मृद व जलसंधारण विभागाकडे पाठपुरावा करण्यात आला आहे.

**प्रकल्पातील गाळाचा उपसा होणे गरजेचे :** पावसाळ्याच्या दिवसात अडवलेला मुख्य नाला व इतर लहान मोठ्या नाल्यांना येणाऱ्या पुरामुळे सदर प्रकल्पात मोठ्या प्रमाणात गाळ साचला आहे. त्यामुळे लवकरच प्रकल्प तुडूंब भरुन अतिरिक्त पाणी सांडव्याद्वारे वाहुन जाते. परिणामी प्रकल्पात पाहिजे त्या प्रमाणात जलसाठा होत नाही. याचा परिणाम थेट रब्बी हंगामातील सिंचनावर होतो. कारण जलसाठा कमी असल्यामूळे प्रकल्प अल्पावधीतच खाली होतो. त्यासाठी गाळाचा उपसा होणे गरजेचे आहे. याकडे संबंधीत प्रशासनाने लक्ष द्यावे अशी मागणी जोर धरत आहे.



गणेशपुर येथील लघु सिंचन प्रकल्पाअंतर्गत बांधण्यात आलेले धरण बांधून बरीच वर्षे झाली आहेत. संबंधीतांच्या दुर्लक्षामुळे भिंतीला तडे गेले आहेत. त्यामुळे पावसाळ्याच्या दिवसात सदर धरण धोकादायक झाले असून पाचंबा व गणेशपुर येथील ग्रामस्थांमधे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या गंभीर बाबीचा संबंधीत विभाने गांभीर्याने विचार करून तातडीने काम हाती घ्यावे हिच अपेक्षा आहे. **शोभा विजय जाधव,** सरपंच, गणेशपुर / पाचंबा गट ग्रा. पं )

# नेवासा तालुका प्रवासी संघटनेच्या महिला प्रतिनिधीपदी जंगले

आधुनिक केसरी न्यूज



**नेवासा :** राज्य परिवहन महामंडळाच्या नेवासा तालुका प्रवासी संघटनेचे अध्यक्ष अनिल पा. ताके यांनी संघटनेचे नेवासा आगार महिला प्रतिनिधी म्हणून ॲड. श्रीमती अलकाताई विठ्ठलराव जंगले पाटील यांची नियुक्ती केली आहे.

ॲड. श्रीमती अलकाताई जंगले यांनी आजपर्यंत विविध सामाजिक संस्था व संघटनांच्या माध्यमातून निस्वार्थी पणे सामाजिक कार्य केलेले आहे. त्यांनी आजपर्यंत केलेल्या कार्याची दखल घेऊन व ॲड. अलकाताई जंगले यांचा महिला व विद्यार्थिनी यांचे प्रश्न सोडविण्यासाठी असलेली तळमळ लक्षात घेऊन त्यांची नेवासा तालुका प्रवासी संघटनेच्या नेवासा एस. टी. आगारच्या महिला प्रतिनिधी म्हणून अनिल ताके यांनी ॲड. श्रीमती अलकाताई जंगले यांची निवड केली आहे. त्याना नियुक्ती चे पत्र नुकतेच श्री ताके यांनी दिले आहे.यावेळी नेवासा तालुका कुणबी मराठा महासंघाच्या महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ.निलीमताई वाबळे पाटील, अशोकराव वाबळे, प्रा. नितीन धस आदी उपस्थित होते. श्रीमती अलकाताई जंगले यांच्या सदर निवडीबद्दल त्यांचे नगर जिल्हा प्रवासी संघटनेचे संस्थापक रणजीतजी श्रीगोड,प्रवाशी संघटनेचे तालुका सचिव पत्रकार सुधीर चव्हाण,रामभाऊ कडु पा.रामराव पा. भदगले यांनी अभिनंदन केले आहे.

# राज्यातील काही जिल्ह्यात पावसाची शक्यता

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** राज्यात सूर्य आग ओकू लागला असून कमाल तापमानसह किमान तापमानाचा पारा देखील झपाट्याने वर चढत आहे. त्याचवेळी भारतीय हवामान खात्याकडून देशाच्या काही भागात पावसाचा इशारा देखील देण्यात आला आहे. आतापर्यंत महाराष्ट्रात पावसाचा अंदाज नव्हता. मात्र, आता राज्यातील काही जिल्ह्यात हलक्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. येत्या २४ तासात देशासह राज्यातील काही भागात अवकाळी पावसाची शक्यता आहे. भारतीय हवामान खात्याने येत्या २४ तासात छत्तीसगड, पश्चिम बंगाल, अरुणाचल प्रदेश, उत्तर ओडिशा, पूर्व झारखंडसह पूर्व विदर्भात पावसाची शक्यता वर्तवली आहे. काही ठिकाणी वादळी वाऱ्यांसह, विजांच्या कडकडाटासह तर काही ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.

# किराणा दुकानात भेसळयुक्त मालाची विक्री

## नागरीकांचे आरोग्य धोक्यात : अधिकाऱ्यांचा कानाडोळा

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** जिवनातील भौतिक गरजा भागविण्यासाठी किराणा दूकानाचा आधार घ्यावा लागतो.सध्या लग्नसराई सुरू झाल्याने चतूर व्यापारी सर्रास भेसळयुक्त मालाची विक्री करून आपल चांगभलं करून घेत असल्याने ग्राहकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.संबधीत अन्न व भेसळ अधिकारी केवळ उद्दिष्टपूर्ती साठी कार्यवाही करीत असल्याचे समजते.व्यापा-याना अभय देत असल्याने जनतेत तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. शहर आणि पंचक्रोशीत गल्लीबोळात दिवसेंदिवस किराणा दुकानाची संख्या वाढते आहे.बहूतांश दूकान दाराकडे अधिकृत परवाना नाही.अव्वाच्या सव्वा दरात मालाची विक्री सुरू आहे. वजनकाटा तपासणी अधिकारी कधी इकडे फिरकत नाही. त्यामुळे वजनात पाप केलं जातं. ज्वारी,मुग,तूरदाळ,गोडतेलमसाला, तांदूळ,मसुरदाळ,गहू,यासह अन्य मालात भेसळ केली जाते आहे.अन्न व भेसळ विभागाचे अधिकारी आपल्या सोयीनुसार तालुक्यात मर्जीतील दुकानदाराकडे भेट देऊन कार्यवाही न करता आपला दौरा आटोपता घेत असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. ग्राहकही गरजेपोटी सारसहन करून चिडीचूप आहेत.संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे जातीने लक्ष देवून ग्राहकाची होणारी हेळसांड थाबवावी अशी जनतेची मागणी आहे.

**खूले गोडतेल विक्री :** मागील अनेक वर्षांपासून खुले गोडतेल विक्रीवर शासनाने बंदी घातली आहे .असे असताना शहरात खूलेगोडतेल पुरवठा केला जात आहे . त्यामुळे येथील व्यापारी ग्राहकांना बिनधास्त खुले तेल देऊन मोकळे होत आहेत .तेलाचा दर्जा तपासुन संबंधित व्यापा-यावर कठोर कार्यवाही करण्यात यावी अशी ग्राहकाची मागणी आहे .

**मिठाईत भेसळ :** शहरातील मुख्य बाजारपेठेत बाहेर राज्यातून आलेले व्यापारी स्वीटमार्टची दूकाने थाटली आहेत .नियमित ताजामाल देण्यासाठी स्वंतत्र खोलीची व्यवस्था करण्यात आली असून कारागीर खोलीची स्वच्छता राखत नाहीत, भेसळयुक्त माल तयार केला जात आहे . या अगोदर मिठाई दूकानातील खाऊवाटप केल्याने शाळकरी मूलाना विषबाधा झाल्याची घटणा घडली होती .

# पिंपळवाडी (पि.) येथील शेख जैद युनूसचा पहिला रोजा

आधुनिक केसरी न्यूज



**पैठण :** सध्या मुस्लिम धर्मातील पवित्र रमजान महिना सुरू असून मुस्लिम धर्मियात वयाच्या आठव्या वर्षापासून रोजा ( उपवास) धरणे बंधनकारक असते. पिंपळवाडी (पिराची) येथील शेख युनूस मंजुरभाई यांचा मुलगा शेख जैद युनूस याने वयाच्या नवव्या वर्षी पहिला रोजा इतक्या कडक उन्हात ठेवून तरुण तो पिढीला प्रेरणा देणारा ठरला आहे. तसेच शेख जैद युनूसने आयुष्यातला पहिला रोजा ठेवून ईश्वराकडे प्रार्थना केली आहे. याबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर